रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २८२
www.ramprahar.com
मंगळवार, ३० एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




## महायुतीसाठी राज ठाकरे मैदानात; ४ मे रोजी पहिली सभा



**मुंबई :** मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिल्यानंतर ते प्रचारसभा कधी घेणार याची उत्सुकता सर्वांना लागली होती. या प्रश्नाचे उत्तर अखेर मिळाले आहे. राज ठाकरे हे केंद्रीय मंत्री आणि रत्नागिरी-सिंधुदुर्गातील भाजप महायुतीचे उमेदवार नारायण राणे यांच्या प्रचारासाठी आपली पहिली सभा घेणार आहेत. येत्या ४ मे रोजी संध्याकाळी ५ वाजता राज ठाकरे यांची कणकवलीत सभा होणार आहे. केंद्रीय मंत्री राणे हे महायुतीचे रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार आहेत. त्यांच्या प्रचारासाठी राज ठाकरे सभा घेतील अशी चर्चा होती. अखेर राज हे महायुतीच्या बाजूने प्रचाराच्या मैदानात उतरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांनी मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यात पंतप्रधान मोदी यांच्यासाठी मी महायुतीला पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले होते.

# व्हिजन घेऊन आम्ही काम करतोय

## ■ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पुण्यात प्रतिपादन

**पुणे : प्रतिनिधी**

काँग्रेसने देशात साठ वर्षे राज्य केले, मात्र काँग्रेसच्या काळात देशातील अर्ध्या जनतेकडे मूलभूत सोयी सुविधा नव्हत्या. आता आम्हाला फक्त १० वर्षे तुमची सेवा करण्यासाठी मिळाली आहेत, पण या दहा वर्षांत आम्ही मूलभूत गरजा पूर्ण केल्या आहेतच, शिवाय प्रत्येक वर्गातील लोकांच्या आकांक्षा पूर्ण कशा होतील याकडे लक्ष केंद्रित केले. एक व्हिजन घेऊन आम्ही काम करतो आहोत. कुणी शहरात असो की गावात चांगले रस्ते, उत्तम पायाभूत सुविधा पाहून त्या माणसांचे मन प्रसन्न होते, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि.२९) केले.



लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात महायुतीच्या उमेदवारांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्राच्या दोन दिवसीय दौऱ्यावर आले असून सोमवारी पहिल्या दिवशी त्यांच्या सोलापूर, कराड आणि पुणे येथे अशा तीन सभा झाल्या. यातील शेवटची सभा हडपसर येथील रेसकोर्स मैदानावर पुण्याचे महायुती उमेदवार मुरलीधर मोहोळ, मावळचे उमेदवार श्रीरंग बारणे, बारामतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार आणि शिरूरचे उमेदवार शिवाजीराव आढळराव-पाटील यांच्या प्रचारार्थ झाली.

या सभेस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, मनसेचे युवा नेते अमित ठाकरे आदी प्रमुख नेतेमंडळी, पदाधिकारी, महायुतीचे उमेदवार, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माझ्यासमोर भगवा सागरच बसला आहे असे मला वाटते आहे. लहान मुले फोटो वगैरे घेऊन आली आहेत. त्यांच्या प्रेमाचा मी आदर करतो. तुम्हा सगळ्यांच्या प्रेमाचाही मी आदर करतो असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणाला सुरुवात केली. पुण्यातल्या या भूमीत महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासारखे समाजसुधारक देशाला दिले आहेत. पुणे हे जितके प्राचीन आहे तितकेच ते सुधारणावादीही आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले.

पुण्यात प्रत्येक क्षेत्रातील उत्तम लोक आहेत. म्हणूनच तर म्हणतात की पुणे तिथे काय उणे? पुणे मेट्रो, पालखी मार्ग, समृद्धी महामार्ग, पुणे विमानतळाचा विकास, हायस्पीड वंदे भारत ट्रेन हे सगळे पुण्यात आहे आणि आधुनिक भारताचे हे चित्र आहे. पुणेकरांनी लिहून घ्या महाराष्ट्रातल्या लोकांना मी सांगू इच्छितो की, तुम्ही लवकरच बुलेट ट्रेनमध्ये प्रवास कराल ही मोदींची गॅरंटी आहे. डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार रिमोटवर चालणारे सरकार होते. त्या सरकारने दहा वर्षांत जितके पैसे खर्च केले ते आम्ही एका वर्षांत खर्च करतो. काँग्रेसच्या काळात आपल्याला मोबाइल आयात करावे लागत होते. आता आपण निर्यात करतो आहोत. भाजपने खूप चांगली कामे युवकांसाठी तसेच समाजातील प्रत्येक वर्गासाठी केली आहेत, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

२०१४च्या आधी दहा वर्षांत तुमच्याकडून महागाई आणि भ्रष्टाचारासाठी डबल टॅक्स वसूल केला गेला. २०१४नंतर आम्ही महागाईही आटोक्यात आणली भ्रष्टाचारी लोकांवर कारवाई केली. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांमध्ये खळबळ माजली आहे. दहा वर्षांमध्ये करवाल्यांना आम्ही सवलती दिल्या आहेत. सात लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले. त्यामुळे देशभरातील करदात्यांची अडीच लाख कोटींची बचत झाली आहे. म्हणून मध्यमवर्गीय कुटुंब आनंदात आहेत, असे पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले.

आयुष्मान योजनेच्या अंतर्गत जनऔषधी केंद्रही आम्ही सुरू केली आहेत. त्यामध्ये ८० टक्के सवलतीच्या दरांत औषधे विकली जातात. गरीब आणि मध्यमवर्गीयांना स्वस्तात औषधे मिळतात. यातून देशभरात मध्यमवर्गीय, गरीब यांचे दीड लाख कोटी रुपये वाचले आहेत, असेही पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

भाजपसह महायुती सरकार महाराष्ट्राला, देशाला पुढे नेत आहेत, मात्र दुसरीकडे इंडिया आघाडी काँग्रेसच्या युवराजाला पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना विचारा गरीबी कशी हटते तर ते म्हणतात खटाखट, खटाखट. युवराजांना विचारा विकसित भारताची योजना काय तर ते म्हणतात टकाटक टकाटक, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी राहुल गांधींची खिल्ली उडवली आहे तसेच यांच्या युवराजांमुळेच लोक त्यांचा पक्ष सोडून जात आहेत, असेही ते म्हणाले.

४५ वर्षांपूर्वी इथल्या एका बड्या नेत्याने आपल्या महत्त्वाकांक्षेसाठी अस्थिरतेच्या खेळाची सुरुवात केली. तेव्हापासून महाराष्ट्रात अस्थिरता आली. अनेक मुख्यमंत्री त्यांचा कार्यकाळही पूर्ण करू शकले नाहीत. हे फक्त विरोधी पक्षालाच अस्थिर करीत नाही, तर आपल्या पक्षात, कुटुंबातही ते असेच करतात, असे पंतप्रधान मोदी खासदार शरद पवार यांचे नाव न घेता म्हणाले.

## नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चेच नाव देण्यात येईल -खासदार बारणे

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी, मनसे, आरपीआय, रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ रविवारी (दि. २८) कामोठे येथे जाहीर सभा झाली. या सभेत बोलताना खासदार बारणे यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने उंच भरारी घेतली असल्याने त्यांनाच पुन्हा पंतप्रधान करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले. त्याचप्रमाणे पनवेल येथे होत असलेल्या नवी मुंबई विमानतळाला भूमिपुत्रांचे दैवत दिवंगत दि.बा. पाटील यांचेच नाव देण्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला.

या सभेत महायुतीचे उमेदवार खासदार बारणे यांनी गेल्या दहा वर्षांत केलेली विकासकामे आणि संसदेतील कामगिरी याची माहिती दिली तसेच विरोधकांकडे प्रचारासाठी मुद्दे नाहीत, त्यांनी कोणतेही काम केलेले नाही. त्यामुळे केवळ आरोप-प्रत्यारोप करण्यापलीकडे ते काहीही करीत नाहीत, अशी टीका त्यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दहा वर्षांत आपल्या देशाने मोठी भरारी घेतली आहे. भारत अगदी चंद्रावर जाऊन पोहचला. दुर्गम अशा आदिवासीवाड्या, वस्त्यांवर वीजपुरवठा आणि रस्त्यांचे काम केल्याचेही त्यांनी सांगत सर्वच क्षेत्रात देशाची कामगिरी उल्लेखनीय आहे याकडे लक्ष वेधले. **(पान २ वर..)**



### पुढच्या पिढीचे भविष्य उज्ज्वल -आमदार प्रशांत ठाकूर

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात म्हटले की, देशात होणारी लोकसभेची निवडणूक ही पुढील पिढीचे भविष्य ठरवणारी आहे. पुढच्या पिढीच्या उज्ज्वल भविष्याची चिंता जितकी आपल्याला आहे त्यापेक्षा जास्त या पिढीचा विकास कशा पद्धतीने होऊ शकतो याची चिंता पंतप्रधान नरेंद्र मोदींना आहे. त्यामुळे या निवडणुकीत पंतप्रधान मोदींना विजयी करण्यासाठी मावळ लोकसभा मतदारसंघातून खासदार श्रीरंग बारणे यांना प्रचंड मताधिक्क्य देऊन विजयी करा.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

## निवडक

### तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांना दिल्ली पोलिसांचे समन्स

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा एक व्हिडीओ एडिट करून चुकीच्या पद्धतीने सोशल मीडियावर प्रसारित केल्याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांना समन्स पाठवले आहे. त्यांना चौकशीसाठी १ मे रोजी हजर राहण्याचे नोटिसीमध्ये म्हटले आहे तसेच व्हिडीओ एडिटींगशची ज्याचा संबंध आहे त्यालाही चौकशीसाठी घेऊन येण्याचे आदेशामध्ये नमूद केले आहे.

### माजी केंद्रीय मंत्री व्ही. श्रीनिवास प्रसाद यांचे निधन

**बंगळुरू :** माजी केंद्रीय मंत्री आणि कर्नाटक चामराजनगरचे विद्यमान भाजप खासदार व्ही. श्रीनिवास प्रसाद यांचे रविवारी मध्यरात्री बंगळुरूतील एका खासगी रुग्णालयात निधन झाले. वयाच्या ७६व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या चार दिवसांपासून ते आयसीयूमध्ये दाखल होते.

## विरोधकांचे मुस्लिम मतांच्या ध्रुवीकरणाचे प्रयत्न अयशस्वी ठरतील

### भाजप नेते आमदार प्रवीण दरेकर यांचा दावा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघात विरोधकांकडे विकासासंदर्भात सांगण्यासारखे कोणतेच मुद्दे नाहीत. त्यामुळे ते भाविनक मुद्दे प्रचारात आणून मुस्लिम मतांच्या ध्रुवीकरणाचे प्रयत्न करीत आहेत. त्यांचे हे प्रयत्न अयशस्वी होतील. रायगड लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणावर मतदान करतील, असा दावा रायगड या मतदारसंघाचे भाजपचे निरीक्षक आमदार प्रवीण दरेकर यांनी सोमवारी (दि. २९) अलिबागमध्ये केला.



खासदार सुनील तटकरे यांच्या प्रचारात महायुतीमधील सर्व घटक पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधण्यासाठी अलिबागमध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद झाली. त्या वेळी भाजप नेते आमदार दरेकर यांनी भूमिका मांडली.

आमदार अनिकेत तटकरे, आमदार महेंद्र दळवी, भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर, गिरीश तुळपुळे, हेमंत दांडेकर, मनसेचे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील हेही पत्रकार परिषदेस उपस्थित होते.

विकसित भारत या मुद्द्यावर भाजप ही लोकसभा निवडणूक लढवत आहे. त्यामुळे आम्ही विकासाच्या मुद्द्यावरच बोलत आहोत. आमच्याकडे विकासाबाबत सांगण्यासारखे बरेच आहे. आम्ही ते सांगतो. विरोधकांकडे विकासकामांसंदर्भात सांगण्यासारखे काहीच नाही. त्यामुळे ते भावनात्मक मुद्दे उपस्थित करीत आहेत, मुस्लिम मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न विरोधक करीत आहेत, मात्र ते यशस्वी ठरणार नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक चांगल्या योजना राबविल्या आहेत. त्याचा लाभ केवळ हिंदूंनाच होत नाही, तर मुस्लिम समाजालादेखील मिळत आहे. त्यामुळे मुस्लिम मतदार नरेंद्र मोदींना पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना मतदान करतील. रायगड मतदारसंघात मुस्लीम समाज खासदार सुनील तटकरे यांना मतदान करतील, असे आमदार प्रवीण दरेकर म्हणाले. **(पान २ वर..)**

### अनंत गीते निष्क्रिय

अनंत गीते सहा वेळा खासदार, दोन वेळा केंद्रात मंत्रीही होते. या कालावधीत त्यांनी रायगडसाठी कोणती विकासकामे केली ती सांगावीत. याउलट खासदार सुनील तटकरे यांनी विकासकामे केली आहेत. ते पालकमंत्री असताना अनेक प्रकल्प आणले. त्याचा फायदा या निवडणुकीत त्यांना होईल, असे आमदार दरेकर या वेळी म्हणाले.

## काँग्रेस उमेदवार अर्ज मागे घेऊन भाजपसोबत

### इंदौरमध्ये इंडिया आघाडीला झटका



**इंदौर : वृत्तसंस्था**

काही दिवसांपूर्वी गुजरातच्या सुरतमध्ये काँग्रेस उमेदवाराचा उमेदवारी अर्ज बाद झाला व इतर उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यानंतर तिथे भाजप उमेदवाराची खासदार म्हणून बिनविरोध निवड झाली होती. त्यानंतर आता मध्य प्रदेशातील इंदौरमध्ये काँग्रेस उमेदवाराने स्वतःचा उमेदवारी अर्ज मागे घेतला असून भाजपची कास धरली आहे. त्यामुळे काँग्रेससह इंडिया आघाडीला मोठा झटका बसला आहे.

इंदौरचे काँग्रेस उमेदवार अक्षय बाम यांनी अर्ज मागे घेतला आहे. इतकेच नाही तर ते काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये दाखल होत आहेत. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि मध्य प्रदेश सरकारमधील मंत्री कैलास विजयवर्गीय यांनी बाम यांच्यासोबतची सेल्फी शेअर करीत याबाबतची माहिती दिली. इंदौरचे काँग्रेसचे उमेदवार अक्षय बाम यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, मुख्यमंत्री मोहन यादव आणि प्रदेशाध्यक्ष व्ही.डी. शर्मा यांच्या नेतृत्वातील भाजपमध्ये स्वागत आहे, असे विजयवर्गीय यांनी म्हटले आहे.





पनवेल : सध्या सर्वत्र गाव जत्रांचा हंगाम सुरू आहे. अशाच प्रकारे न्हावाखाडी येथील श्री म्हसेश्वर आणि गावधनी देवीची जत्रा सोमवारी झाली. यानिमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तेथील मंदिरात जाऊन दर्शन घेतले. या वेळी न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच राजेश म्हात्रे, सदस्य सागर ठाकूर, मंदिर कमिटी अध्यक्ष सी.एल. ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, स्वप्नील ठाकूर, अमोघ ठाकूर, मदन ठाकूर, जी.के. ठाकूर, श्रीधर मोकल आदी उपस्थित होते.

## उत्तर भारतीय समाजाचे महायुतीला समर्थन

### ■ खासदार श्रीरंग बारणे यांना मतांची आघाडी द्या -डॉ. संजय पांडे

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जातपात, धर्म न मानता सर्वधर्मसमभाव जपणारे आणि अंत्योदयाचा विचार करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. त्यामुळे त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्यासाठी मावळ लोकसभा मतदारसंघातून खासदार श्रीरंग बारणे यांना मतांची आघाडी द्या, असे आवाहन भाजपचे उत्तर भारतीय प्रदेशाध्यक्ष डॉ. संजय पांडे यांनी खारघर येथे उत्तर भारतीय समाजाच्या बैठकीत केले. या वेळी जोरदार घोषणा देत उत्तर भारतीय समाजाने समर्थन दिले.



खारघर येथे रविवारी (दि.२८) झालेल्या या बैठकीस भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, आरपीआय, रासप, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, **(पान २ वर..)**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून काम करीत आहेत. त्यांच्यामुळे देश सुरक्षित आहेत. एकीकडे मोदीजी सामर्थ्यवान नेता म्हणून जगात प्रसिद्ध आहेत, तर दुसरीकडे राहुल गांधी कॉमेडियन म्हणून प्रसिद्ध झाले आहेत.**
**-संतोष गुप्ता, प्रदेश सरचिटणीस, उत्तर भारतीय मोर्चा**

**जो राम को लाये है, उनको आगे लाना है. आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेहमीच आम्हा सर्व भगिनींना पुढे नेण्याचे काम केले आहे. त्यामुळे आम्ही सर्व त्यांच्या पाठीशी आहोत.**
**-संतोषदीदी, नेत्या, उत्तर भारतीय समाज**

**आता हॅट्ट्रिक सरकार बनणार आहे. २०२४चा विजय झाला आहे, २०२९ची तयारी सुरू आहे. पनवेलच्या विकासाचा आलेख उंचवण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले असून त्यांच्या नेतृत्वात काम करीत आहोत याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. नरेंद्र मोदींना पंतप्रधान करण्यासाठी आप्पा बारणे यांना खासदार करायचे आहे.**
**-संतोषकुमार शर्मा, जिल्हाध्यक्ष, उत्तर भारतीय मोर्चा**

# ओबीसी, एससी, एसटी समाजाच्या आरक्षणाला काँग्रेसकडून धोका!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा तुफानी हल्ला



**सोलापूर, सातारा : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची आणि महाराजांच्या नौदलाच्या शक्तीविषयी संपूर्ण जगाला आदर आहे, पण गुलामगिरीच्या मानसिकतेत गुरफटलेल्या काँग्रेसने मात्र, भारतीय नौदलाच्या झेंड्यावरील ब्रिटीशांचे चिन्ह स्वातंत्र्यानंतरही बदलले नाही. मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर नौदलाच्या ध्वजावर छत्रपतींचे मानचिन्ह विराजमान झाले. याच काँग्रेसकडून ओबीसी, दलित, आदिवासी समाजाला घटनेने दिलेल्या आरक्षणाला धोका निर्माण केला जातो आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी सोलापूर, कराड येथील सभांतून काँग्रेसला पुन्हा लक्ष्य केले.

सातारा लोकसभा मतदारसंघातील भाजप – महायुतीचे उमेदवार छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या प्रचारासाठी कराड येथे झालेल्या सभेत पंतप्रधान मोदी यांनी संरक्षण दलाच्या सामर्थ्याची जाणीव करून देताना, महाराष्ट्र ही शौर्याची, सामाजिक न्यायाची भूमी असल्याचे गौरवोद्गार काढले. आरक्षणाच्या मुद्द्यावरून सध्या सुरू असलेल्या अपप्रचाराचाही मोदी यांनी तीव्र शब्दांत समाचार घेतला. विरोधकांना प्रचारासाठी मुद्दे सापडत नसल्याने आता अपप्रचार सुरू झाला असून सध्या भाजपाच्या अनेक नेत्यांच्या आवाजात, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून बदनामीकारक व खोटी वक्तव्ये प्रसृत केली जात असल्याचे सांगून श्री. मोदी यांनी या हीन राजकारणाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली. अशा अपप्रचारापासून समाजाला वाचविण्यासाठी सावध रहा व असे व्हिडिओ समाजमाध्यमांवर दिसल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्या, असे आवाहनही पंतप्रधान मोदी यांनी केले. या सभेला केंद्रीय मंत्री रामदास आठवले, भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार शिवेंद्रसिंह राजे भोसले, भाजप प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील आदी उपस्थित होते.

### देशातील गरीबांचा विकास रोखण्याचे काँग्रेसचे प्रयत्न

*आपल्या साठ वर्षांच्या सत्ताकाळात देशातील गरीबांचा विकास रोखण्यासाठी काँग्रेसने परोपरीने प्रयत्न केले आणि या वर्गाचा केवळ मतांकरिता वापर करून घेतला, असा आरोपही त्यांनी केला. आता मोदींवर टीका करणे एवढा एक कलमी कार्यक्रम काँग्रेस आघाडी राबवत असून देशाच्या विकासाबाबत या आघाडीकडे मुद्दे नसल्याने मोदींना शिवीगाळ करणे, संविधान बदलणार, आरक्षण हटविणार अशा खोट्या गोष्टी पसरवून जनतेत संभ्रम माजविण्याचे काम इंडीया आघाडीकडून सुरू आहे. आमच्या सत्ताकाळात कोठेही खोटेपणाला वाव नव्हता, हे जनतेने अनुभवले आहे, असेही ते म्हणाले.*

सातारा ही वीरांची भूमी आहे, या भूमीतील जनतेला आज देशाच्या लष्करी शक्तीचा निश्चितच अभिमान वाटत असेल, कारण आता लष्कराकडे मेड इन इंडिया शस्त्रे आहेत. यामुळेच शस्त्रांच्या दलालांची दुकाने बंद झाली असून विरोधकांची हीच पोटदुखी आहे, असेही ते म्हणाले. देशाच्या अभिमानाला, अस्मितेला आणि एकतेला शक्ती देण्याची ग्वाही मी सत्तेवर आलो तेव्हा जनतेला दिली होती, आणि आता ती पूर्ण केली आहे. मोदी सरकारने सैन्यदलात वन रँक वन पेन्शन योजनाही लागू केल्याचा उल्लेखही मोदी यांनी या वेळी केला. महाराष्ट्रातील गडकिल्ले आणि ऐतिहासिक ठिकाणांना तसेच देशभरातील सर्व किल्ल्यांचा समावेश जागतिक वारसा यादीत करण्याचे काम सुरू आहे, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

या सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार विजय देशमुख, आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान अवताडे, नरेंद्र काळे आदी उपस्थित होते.

# 'पनवेल महापालिका नवीन मुख्यालयाच्या कामाला गती द्या'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनीच्या ब्रीजला लागून असणारी, काळसेकरअभियांत्रिकी महाविद्यालयाजवळ पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयाची भव्य दिव्य इमारत उभारली जात आहे. नुकताच मुख्यालयाच्या कामाचा आढावा प्रभारी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी घेतला. या वेळी महानगरपालिकेच्या मुख्यालयाचे काम वेगाने करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. या वेळी उपायुक्त डॉ.वैभव विधाते, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

तळघरासहीत सहा मजली बांधण्यात येणाऱ्या या इमारतीच्या सध्या तिसऱ्या मजल्याचे काम सुरू आहे. सुमारे चार लाख आठ हजार ६३ चौफूट क्षेत्रामध्ये ही इमारत बांधली जात आहे. ही इमारत इंडियन ग्रीन बिल्डींग कौन्सिल यांच्या प्लॅटिनम रेटिंगची ग्रीन बिल्डींग होणार आहे. त्या दृष्टीने या इमारतीची संकल्पना वास्तूविशारद हितेन सेठी यांच्याकडून करून घेण्यात आली आहे. त्याच पध्दतीने या इमारतीच्या बांधकामाचे साहित्य वापरते जात आहे. या इमारतीमध्ये २२४ आसन क्षमता असलेले एक महापालिका मुख्य सभागृह, एक बहुद्देशीय सभागृह, दोन समिती सभागृहे, टेरेसवरती आर्ट गॅलरी उभारण्यात येणार आहे.

या इमारतीमधील दोन स्वागतकक्ष व पार्किंग येथील दोन पिलर्समधील अंतर जास्त असल्यामुळे या ठिकाणी ग्रीड स्लॅब, वाईडेड स्लॅब, पोस्ट स्ट्रेस पध्दतीचे स्लॅब टाकण्यात येत आहेत. इमारतीचे स्थापत्य विभागाचे काम ४० टक्के पुर्ण झाले असून स्थापत्य संबधीचे सर्व एप्रिल २०२५पर्यंत पुर्ण होण्याचा विश्वास



प्रकल्प अभियंता यांनी दिला. याबाबत या वेळी कंत्राटदाराला देखील सुचना करण्यात आल्या असून त्याबाबत दैनंदिन नियोजन करण्यात आले आहे. या कामाच्या दैनंदिन तांत्रिकबाबीकरिता स्वतंत्र अभियंत्याची नियुक्ती पनवेल महापालिकेने केली आहे.

या कामाचा दर्जा सर्वोत्तम रहावा याकरिता वेळोवेळी व्हीजेटीआय या नामांकित शासकिय महाविद्यालयाच्या विशेष तज्ज्ञांकडून त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण केले जात आहे. या कामाचे स्टील व सिमेंट हे आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या व दर्जेदार पुरवठा करणाऱ्या कंपनीकडूनच घेणे बंधनकारक केले आहे. अशी माहिती प्रकल्प अभियंता संजय कटेकर यांनी दिली आहे. इमारतीचे काम प्रगतीपथावरअसल्याचे पाहून आयुक्तांनी समाधान व्यक्त केले आहे.

भविष्यात स्थापत्य कलेचा अव्दितीय उदाहरण म्हणून गणली जाणारी महापालिकेच्या मुख्यालयाची इमारत पनवेलकरांची अस्मिता ठरणार असल्याने वेगाने कामे पुर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी या वेळी उपस्थित अधिकारी वर्गास दिल्या.

# शॉर्टसर्किटमुळे घर जळाले; कळंबोली वसाहतीमधील घटना

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वसाहतीमधील गुरुव्हिला सोसायटीतील बंद घरात शॉर्टसर्किटने आग लागून संपूर्ण घर बेचिराख झाले. घरात कोणी नसल्याने सुदैवाने जीवितहानी टळली. घरात दोन गॅसचे सिलेंडर होते, मात्र शेजाऱ्यांनी वेळीच प्रसंगावधान राखून घराचा दरवाजा तोडून अग्निशमन दलाला पाचारण केल्याने अनर्थ टळला. कळंबोलीचे अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवले.

कळंबोली वसाहतीमधील सेक्टर ४मध्ये असलेल्या गुरुव्हिला सोसायटीतील डी विंग मधील ३०३ क्र. सदनिका किशोर काना पाटील यांच्या मालकीची आहे. या घरात बिपिन सिंह हे भाड्याने राहत आहेत. सकाळी नेहमीप्रमाणे त्यांनी घरातील काम आटोपून बाजारहाट करण्यासाठी बाहेर गेले असता, घरात शॉर्टसर्किटमुळे आग लागली. घर बंद अवस्थेत असल्याने घरातूनच धुराचे लोट व आगीच्या ज्वाला बाहेर खिडकीतून येऊ लागल्या. प्रसंगावधान राखून शेजारी राहत असलेल्या हेमंत पिसे यांनी व अन्य दक्ष नागरिकांनी घराचा दरवाजा तोडून पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. सोसायटीचे सचिव उमाकांत गव्हाणे यांनी तत्काळ अग्निशमन दलाला पाचारण केले.

अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवले व घरात प्रवेश करून गॅसचे दोन सिलेंडर बाहेर काढून ते निकामी केले. आगीच्या घटनेचे वृत्त कळताच माजी नगरसेवक बबन मुकादम यांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनास्थळी पाहणी केली व नागरिकांना धीर दिला.

# तापमानात वाढ झाल्याने नागरिकांनी काळजी घ्यावी

## कोकण विभागीय आयुक्तांचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागातील तापमानात वाढ झाल्याने उष्माघाताचे प्रमाण वाढले आहे. उष्णतेच्या लाटेमुळे होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी दुपारी १२ ते ३च्या वेळी अनावश्यक घराबाहेर पडू नये. आपली आणि आपल्या कुटुंबीयांची काळजी घ्यावी असे आवाहन कोंकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

वातावरणातील तापमान प्रमाणाबाहेर वाढले की शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. उष्माघात झाल्यावर चक्कर येणे, मळमळ, उलट्या होणे, डोकेदुखी, दरदरून घाम फुटणे, थकवा येणे स्नायूंना आकडी येणे अशी लक्षणे दिसू लागताच जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क करावा.

उष्माघात होऊ नये म्हणून तहान लागलेली नसली तरीसुध्दा जास्तीत जास्त पाणी पिण्यात प्यावे, हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत, बाहेर जातांना गॉगल्स, छत्री अथवा टोपी, बूट व चपलांचा वापर करण्यात यावा, प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी. कोकणातील जनतेने काळजी घ्यावी.

उन्हाळ्यात त्रास होऊ लागल्यास जवळच्या शासकीय जिल्हा रुग्णालय अथवा तालुका किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क करावा. अनेक आरोग्य केंद्रात उष्णतेचा त्रास होणाऱ्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षाची सोय करण्यात आली आहे.

# वरसे येथे महायुतीचा डोअर टू डोअर प्रचार

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील वरसे येथे महायुतीचे उमेदवार सुनिल तटकरे यांच्या प्रचार राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना, मनसे व आर पी आय हे संयुक्तपणे राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड जिल्हा अध्यक्ष मधुकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी घड्याळ या चिन्हांची निशाणी जवळपास साडेसात हजार मतदारां पर्यंत डोअर टू डोअर केली. या प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असुन सुनील तटकरे हे पुन्हा निवडून येतील अशी गॅरंटी मतदारांनी दिली.



वरसे, भुवनेश्वर, निवी, ठाकुरवाडी यासह ग्रामपंचायत हद्दीतील सर्व वसाहतीत मध्ये सुनील तटकरे यांचा प्रचार करण्यात आला. दरम्यान वरसे व अन्य भागांमध्ये खासदार सुनिल तटकरे साहेब यांनी कोट्यावधी रुपयांची विकास कामे केली गेलेली आहेत. त्यामुळे मतदार राजा हा देशाच्या विकासाच्या दृष्टीने रायगडचा बुलंद आवाजळ, विकासपुरुष सुनील तटकरे पुन्हा या लोकसभा निवडणुकीत वरसे या विभागातुन प्रचंड मताधिक्य देवुन तटकरे साहेब नक्कीच विजयी होतील दिल्लीत महायुतीचे खासदार असतील अशी आशा वरसे ग्रामपंचायत सरपंच अमित मोहिते व्यक्त केली.

या वेळी माजी सरपंच नरेश पाटील यासह वरसे येथील सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच सर्व राष्ट्रवादीचे पदाधिकारी, शिवसेना, भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कळंबोलीमध्ये काकाकडून पुतणीवर अत्याचार

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोलीत राहणाऱ्या एका काकाने आपल्या पुतणी अल्पवयीन असताना शीतपेयातून तिला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. त्याने पीडित तरुणीचे आठ वर्षांपूर्वी काढलेले अश्लील व आक्षेपार्ह व्हिडीओ–फोटो तिच्या पतीला पाठवून तिची बदनामी केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणातील पीडित तरुणी व तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा तिचा चुलत काका हे दोघेही कळंबोलीत राहण्यास आहेत. २०१६मध्ये पीडित तरुणी अल्पवयीन असताना, काकाने तिला तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. त्यावेळी काकाने पीडित तरुणीचे नग्नावस्थेतील फोटो व व्हिडीओदेखील काढले होते. दरम्यान, पीडित तरुणीचे लग्न झाल्यानंतर ती आपल्या पतीसोबत राहत असताना, आरोपी काकाने ते फोटो व व्हिडीओ तिच्या पतीला पाठवून तिची बदनामी केली. या प्रकारानंतर पीडित तरुणीने काकाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# नवकवींनी काव्य रचताना विषयाच्या गाभ्यात शिरले पाहिजे –अरुण म्हात्रे

**कर्जत : प्रतिनिधी**

कोणतीही कविता सादर करताना त्या विषयाचा गाभा आपल्याला समोरच्या रसिकांना सांगता आला पाहिजे असा सल्ला नवकवींना ज्येष्ठ कवी, गीतकार अरुण म्हात्रे यांनी दिला.

माथेरान येथील प्राचार्य गव्हाणकर हायस्कूलचे शिक्षक संघापाल वाठोरे यांच्या अन् देव निरुत्तर झाला या कविता संग्रहाचे प्रकाशन आज झाले. नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांचे हस्ते कविता संग्रहाचे प्रकाशन झाले. या वेळी ठाणे येथील जोशी बेडेकर महाविद्यालयाचे



मराठी विभाग प्रमुख आणि ज्येष्ठ साहित्यिक प्रा.दामोदर मोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून सावळाराम जाधव, लेखक गिरीश कंटे, चित्रकार राजेंद्र दगडे, मल्हार पवार, शिवाजी शिंदे आदी उपस्थित होते. या कविता संग्रहातील काही कवितांचे वाचन सह शिक्षक सचिन भोईर आणि कवी वाठोरे यांच्या पत्नी कडून सादरीकरण केले. पीपल्स पब्लिकेशन कडून अन देव निरुत्तर झाला हा कविता संग्रह प्रकाशित केला आहे. या कार्यक्रमाचे सूत्रथ्संचालन संजय शिंदे यांनी केले.

पान १ वरून

## नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चेच नाव देण्यात येईल –खासदार बारणे

सभेला भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, क्लस्टर प्रमुख बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, गोपीनाथ भगत, विकास घरत, कुसूम म्हात्रे, हेमलता गोवारी, अरुणा भगत, प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, भाजप नेते सुनील गोवारी, हर्षवर्धन पाटील, प्रदीप भगत, युवा नेते हॅप्पी सिंग, शिवसेनेचे तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे, भाजप महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, कामोठे शहर अध्यक्ष वनिता पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विरोधकांचे मुस्लिम मतांच्या ध्रुवीकरणाचे प्रयत्न अयशस्वी ठरतील

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली घटना कुणीच बदलू शकत नाहीत. घटना बदलणार हा काँग्रेसचा अपप्रचार आहे. काँग्रेसने घटनेत ८० वेळा दुरुस्ती केली. काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लोकसभा निवडणुकीत दोन वेळा पराभव केला, तर भाजपने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान केला. भाजपने देशात संविधान दिन साजरा करण्यास सुरुवात केली. डॉ. आंबेडकर यांचे परदेशातील निवासस्थानाचे स्मारक केले. त्यांच्या जीवनाशी संबंधित स्थळे विकसित केली. काँग्रेसला हे करता आले नाही आणि आता काँग्रेसला बाबासाहेबांचा पुळका येतोय, अशी टीका आमदार प्रवीण दरेकर यांनी केली.

यापूर्वी महायुतीतील घटक पक्ष एकमेकांविरोधात लढलो आहोत. एकमेकांवर आरोप केले आहेत, परंतु हे विसरून देशाच्या हितासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. महायुतीमधील सर्व घटक पक्षांतील कार्यकर्ते एकमेकांशी समन्वय ठेवून या लोकसभा निवडणुकीत काम करतील आणि खासदार सुनील तटकरे यांना विजयी करतील, असा विश्वास आमदार दरेकर यांनी व्यक्त केला.

## उत्तर भारतीय समाजाचे महायुतीला समर्थन

प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश चिटणीस शिवदास कांबळे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी नगरसेवक हरेश केणी, शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ब्रिजेश पटेल, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, शिवसेनेचे तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे, उत्तर भारतीय समाजाचे प्रदेश सरचिटणीस संतोष गुप्ता, रायगड जिल्हाध्यक्ष संतोषकुमार शर्मा, उत्तर भारतीय समाजाच्या नेत्या संतोषदीदी, संतोष त्रिपाठी, राजेश पांडे, शैलेश सिंग, आर.पी. पांडे, आर.के. त्रिपाठी, अ‍ॅड. इंदू दुबे, दीपक शिंदे, अमर उपाध्याय यांच्यासह उत्तर भारतीय समाजाचे नेते कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी बोलताना डॉ. संजय पांडे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीकेची झोड उठवली. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा राहुल गांधी अवमान करतात आणि उद्धव ठाकरे स्वागत करतात. यावरून उद्धव ठाकरेंचे हिंदुत्व काय आहे ते स्पष्ट होते. बाळासाहेबांचा भाजपला नेहमी पाठिंबा राहिला, मात्र उद्धव ठाकरे यांनी त्यालाही तिलांजली दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेबांची शिकवण कायम आपल्या उराशी ठेवली आणि त्यामुळे श्रीरंग बारणे हे ओरिजिनल शिवसेनचे उमेदवार आहेत.

काँग्रेसने राजकारण करीत भारतातून काश्मिर वेगळे करण्याचा घाट घातला, मात्र पंतप्रधान मोदी सामर्थ्यामुळे काश्मिर भारताचे अविभाज्य घटक बनले आहे. स्वतः राजीव गांधी सांगायचे मी १०० रुपये पाठवले तर लाभार्थीकडे फक्त १५ रुपये पोहचायचे आणि काँग्रेसच्या दलालांकडे ८५ रुपये जायचे, मात्र आता मोदीजींच्या दूरदृष्टीमुळे लाभार्थ्यांच्या खात्यात थेट १०० टक्के रक्कम पोहचत असून काँग्रेसच्या दलालांची दुकाने बंद झाल्याने केविलवाणी धडपड सुरु आहे. पूर्वीच्या पद्म पुरस्कारांची यादी पहा आणि मोदींच्या काळातील पहा. तळागाळातील काम करणाऱ्या लोकांचा बहुमान मोदी सरकारने केला आहे. आदिवासी महिला द्रौपदी मुर्मू राष्ट्रपती झाल्या हा संपूर्ण देशाचा गौरव आहे, मात्र येथेही काँग्रेसने त्यांचा अवमान केला यावरून काँग्रेसची नीती काय आहे हे स्पष्ट झाले. मोदीजींमुळे आपला देश जागतिक अर्थव्यवस्थेत ११व्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर आला आहे आणि यापुढे जगात तिसऱ्या क्रमांकावर झेप घेणार आहे. त्यासाठी त्यांना आपल्या मतांची ताकद देणे गरजेचे आहे, असे डॉ. पांडे म्हणाले.

५०० वर्षांची राम मंदिराची प्रतीक्षा पंतप्रधान मोदींनी संपवली आणि अयोध्येत भव्य दिव्य मंदिर उभारले. वसुधैव कुटुंबकम मानून काम करणारे मोदीजी आहेत. संपूर्ण देश एकसंध आणि सुरक्षित ठेवण्याचे काम ते करीत आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान कुणीही बदलू शकत नाही. असे असताना काँग्रेस आणि इतर विरोधक स्वार्थी राजकारणापोटी अपप्रचार करीत आहेत. त्यांच्या भूलथापांना कदापि बळी पडू नका, असे आवाहनही डॉ. पांडे यांनी केले.

या वेळी खासदार श्रीरंग बारणे यांनी म्हटले की, देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली काम करीत असताना या विभागात मेट्रो, विमानतळ, अटल सेतू, रस्ते, वीज, मूलभूत सुविधा देण्यासाठी नेहमी आग्रही राहिलो आहे आणि अशा सर्व कामांची माहिती विकासपर्व या माझ्या पत्रकात मांडली आहे, मात्र ज्यांनी डोळ्यावर पट्टी बांधलेली आहे त्यांना हा विकास कसा दिसणार? लोकांची जास्तीत जास्त कामे झाली पाहिजेत यासाठी आम्ही आग्रही असतो, परंतु निवडणुकीच्या तोंडावर विरोधकांना बोलायला मुद्देच नाहीत. म्हणून विरोधकांकडून खोडसाळपणा सुरू असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

अडीच वर्षात ठाकरे सरकार निरुत्साही राहिले. त्यामुळे राज्याचा विकास त्यांच्या काळात खुंटलाम मात्र खासदार श्रीरंग बारणे लोकांची कामे करीतच होते. म्हणूनच त्यांचा सहावेळा संसदरत्न पुरस्काराने सन्मान झाला आहे. दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची मोठी प्रगती केली. विकासाचा वेग अधिक करण्यासाठी मोदीजींच्या रूपाने खासदार श्रीरंग बारणे काम करणार आहेत. त्यामुळे धनुष्यबाण निशाणी लक्षात ठेवून प्रचंड मतांनी त्यांना विजयी करा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

# संविधान कधीही बदलणार नाही, विरोधकांनी अपप्रचार करू नये -खासदार श्रीरंग बारणे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशात कुणाचीही सत्ता असू द्या, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान कधीही बदलणार नाही. त्यामुळे विरोधकांनी स्वतःची राजकीय पोळी भाजण्यासाठी संविधानाबाबत अपप्रचार करू नये, असा सूचना वजा इशारा महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी खांदा कॉलनी येथे झालेल्या बैठकीत दिला. कामगार व रिक्षा चालकांची बैठक झाली. त्यावेळी आपले विचार मांडताना ते बोलत होते.

या बैठकीला भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी महापौर कविता चौतमोल, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश चिटणीस शिवदास कांबळे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, शहर अध्यक्ष अनिल भगत, शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर, शिवाजी थोरवे, जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, वंदे मातरम जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष रवी नाईक, पांडुरंग पाटील, विनायक मुंबईकर, भीमराव पोवार, मोतीलाल कोळी यांच्यासह कामगार व रिक्षाचालक मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार श्रीरंग बारणे यांनी पुढे म्हटले की, अबकी बार चारसौ पारची घोषणा केल्यानंतर विरोधकांची हवा गुल झाली आणि त्यांना भीतीही वाटली आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीचा प्रचार सुरू झाल्यापासून विरोधकांनी संविधानाचे राजकरण करायला घेतले आहे. संविधान बदलण्याचा कोणताही प्रयत्न नसताना राहुल गांधी आणि इतर विरोधकांनी प्रचाराचा रचलेला षडयंत्र जनताच हाणून पाडत आहे, असेही बारणे यांनी नमूद केले. डॉ. बाबासाहेबांचे लंडन मधील घर खरेदी करून त्या ठिकाणी बाबासाहेबांचे स्मारक करण्यात आले हे काम तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. तर मुंबईतील इंदू मिल मधील स्मारकाचे काम उद्धव ठाकरे यांच्या सरकारने ठप्प केले. ते काम प्रगती पथावर नेण्यासाठी केंद्र व राज्य सरकार आग्रही आहे, असे सांगतानाच विरोधकांना बाबासाहेब समजलेत नाहीत, अशा शब्दात विरोधकांच्या प्रचाराची हवा घालवली. देशातील प्रत्येक जाती धर्मातील लोकांना सन्मान देण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे, असे सांगून उद्धव ठाकरेंचे सरकार असताना त्या ठिकाणी लोकप्रतिनिधींना किंमत नव्हती असेही आप्पा बारणे यांनी नमूद केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, ही निवडणूक देशाच्या भवितव्यासाठी महत्वपूर्ण आहे. पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण देशवासियांना दिला आहे. सबका साथ सबका विश्वास या उद्देशाने प्रेरीत होऊन काम केले जात आहे. मोदीजींच्या कामाने देशात तर आहेच, पण संपूर्ण जगात प्रभाव आहे. मोदीजी चहा विकायचे हे अभिमानाने सांगतात त्याचप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपण रिक्षाचालक होतो हे अभिमानाने सांगतात, त्यामुळे त्यांना तुमच्या प्रश्नांची जाण आहे, असे सांगतानाच तुमच्या सर्वांच्या पाठिंब्यावर श्रीरंग आप्पा बारणे खासदारकीच्या विजयाची हॅट्रिक करणार आहेत.

**कामगार म्हणून काम करताना प्रश्न सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधींची आवश्यकता असते. संघटनेचे प्रश्न आपले आहेत असे मानून ते सोडविण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी करत असतात. आमदार प्रशांत ठाकूर यांची हॅट्रिक झाली आता आप्पा बारणे हॅट्रिक करणार आहेत.**

**-जितेंद्र घरत, अध्यक्ष, जय भारतीय जनरल कामगार संघटना**

**रिक्षाचालक मालकांचे प्रश्न सरकार दरबारी मांडून न्याय मिळवून देण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. त्यामुळे त्यांच्या पाठीशी संघटना ठाम आहे आणि त्या अनुषंगाने खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांना मताधिक्य देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**

**-रवी नाईक, अध्यक्ष,वंदे मातरम जनरल कामगार संघटना**

# दक्षिण भारतीय समाजाचा महायुतीला पाठिंबा; नवीन पनवेलमध्ये बाईक रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी यांच्यासह मित्रपक्ष महायुतीचे मावळ लोकसभेचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतली आहे. या प्रचाराच्या पार्श्वभुमीवर रविवारी (दि. २८) नवीन पनवेल परिसरात भव्य बाईक रॅली काढण्यात आली होती. या रॅलीची सांगता ही दक्षिण भारतीय समाज संमेलनात झाली. या संमेलनात महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांना एकमताने पाठिंबा जाहीर करण्यात आला.

दरम्यान, श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी काढण्यात आलेल्या बाईक रॅलीमध्ये शेकडे तरुण महायुतीतील आपापल्या पक्षाचे झेंडे घेऊन सहभागी झाले होते. रॅलीमधील विजया रथावर खासदार बारणे, यांच्यासह आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे क्लस्टर प्रमुख बाळासाहेब पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह महायुतीच्या घटक पक्षातील पदाधिकारी उपस्थित होते. चौका-चौकात फटाके वाजवून, पुष्पवृष्टीमध्ये सुवासिनींकडून औक्षण करण्यात येत होते. मोदींचा मुखवटा परिधान केलेल्या युवकही रॅलीत सहभागी झाले होते. रॅलीमध्ये रिक्षाचालकांचा सहभाग ही उल्लेखनीय होता. काही तरुण-तरुणींनी कोळी नृत्य सादर करत बारणे यांचे जोरदार स्वप्न रस्त्याच्या दुतर्फा जमा झालेल्या जनसमुदायाला बारणे यांनी अभिवादन करून मतदारांचे आशीर्वाद घेतले.

या बाईक रॅलीची सांगता ही पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती संतोष शेट्टी यांनी आयोजीत केलेल्या दक्षिण भारतीय समाज संमेलनात झाली. या ठिकाणी उपस्थित असलेल्या दक्षिण भारतीयांनी लोकसभा निवडणूकीसाठी श्रीरंग बारणे यांना एकमताने पाठिंबा जाहीर केला.

या बाईक रॅलीला तसेच दक्षिण भारतीयांचा संमेलनाला खासदार श्रीरंग बारणे, भाजपे मावळ लोकसभा निवडणुक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, क्लस्टर प्रमुख बाळासाहेब पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, संतोष शेट्टी, समीर ठाकूर, तेजस कांडपीळे, अक्षय सिंग, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्षा राजश्री वावेकर, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, भास्कर शेट्टी, युवा नेते हॅप्पी सिंग, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव, नितेश पाटील, जयेश नांबीराय, योगेश कोठारी, सुजित कोठियाल, रवी पिल्ले, शंकर राव, श्वेता शेट्टी, आशा शेट्टी, यमुना प्रकाशन, गौरव नाईक, प्रवीण मोरबाळे, प्रशांत शेटे, स्वरूप मुंबईकर, मयूर आंग्रे, अक्षय सिंग, आकाश बैद यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि दक्षिण भारतीय समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत १० डिसेंबर, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा २०२३-२०२४ (इयत्ता आठवी) या परीक्षेत चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल येथील मराठी माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले असून ते शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.

प्रणित विलन पाटील एसटी संवर्ग १९वा क्रमांक, स्नेहल नानासाहेब मरकड जीईएन संवर्ग ७८ वा क्रमांक अशी





शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची नावे आहेत.

शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, कार्यकारिणी मंडळ सदस्य, विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

# खासदार बारणेंच्या विजयाचा पंजाबी, हरियाणवी बांधवांचा निर्धार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुढील पाच वर्षे ही देशासाठी निर्णायक असणार आहेत. त्यामुळे देशासाठी वेळ काढून आपले भविष्य सुरक्षीत ठेवण्यासाठी तसेच नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी येत्या १३ तारखेला धनुष्यबाणासमोरील बटन दाबून मतदान करा, असे आवाहन भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, आरपीआय, रासप, पीआरपी आणि मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी पंजाब आणि हरियाणामधील बांधवांच्या बैठकीवेळी केले.

मावळ लोकसभेचे महायुतीचे अधिकृत उमेदवार श्रीरंग बारणे यांचा पनवेल विधानसभा मतदार संघात जोरदार प्रचार सुरू आहे. त्यानुसार श्रीरंग बारणे यांचा पनवेल भेट दौरा आयोजित करून श्रीरंग बारणे यांनी समाजबांधवासोबत रविवारी संपर्क साधला. या पार्श्वभुमीवर कळंबोली येथील देवांशी हॉटेलमध्ये पंजाब आणि हरियाणा बांधवाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी फिरसे एकबार तीर कमान फिरसे एकबार मोदी सरकार हा नारा देत समाजबांधवांनी श्रीरंग बारणे यांना समर्थन देत त्यांना विजयी करण्याचा विश्वास दिला.





या वेळी श्रीरंग बारणे यांनी सांगीतले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षा केलेल्या कामांच्या जोरावर जागतिक स्तरावर देशाचे नाव उंचवण्याचे काम केले. त्यांच्यामुळे देशासह महाराष्ट्रात सर्व जाती आणि धर्मांचे बांधव शांततेत राहत आहेत. त्यामुळे देशाला सुरक्षीत ठेवण्यासाठी पुन्हा एकदा नरेंद्र मोदींना विजयी करण्यासाठी येत्या १३ तारखेला मतदान करा, असे आवाहन करून तुमच्या आशीर्वाद आणि सहयोगातून मी तीसऱ्यांदा पुन्हा संदेत जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी मावळ लोकसभा मतदारसंघातून श्रीरंग बारणे हे तीन लाखांहून अधिक मतांनी निवडणूक येथील असा विश्वास व्यक्त केला तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी जे बोलतात ते करतात याची गॅरंटी आहे. त्यामुळे नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी धनुष्यबानासमोरील बटन दाबून श्रीरंग बारणे यांना विजयी करा, असे आवाहन केले. या बैठकीला महायुतीचे अधिकृत उमेदवार श्रीरंग बारणे, भाजपचे मावळ लोकसभा निवडणुक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख परेश ठाकूर, जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, गुरुद्वारा सुप्रीम कौन्सिल ऑफ नवी मुंबईचे प्रेसीडेंट जसपास सिंग सिंद्धू, सुखविंदर सिंग, माजी नगरसेवक राजेश शर्मा, सित्तु शर्मा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश चिटणीस शिवदास कांबळे, युवा नेते हॅप्पी सिंग यांच्यासह समाज बांधव मोठ्या सख्येने उपस्थित होते.

# नवघरमध्ये शनी महाराज प्राणप्रतिष्ठापना सोहळा

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील नवघर गावातील माजी सरपंच शेखर प्रकाश तांडेल यांच्या वतीने नव्याने बांधण्यात आलेल्या श्री शनी महाराज मंदिरात श्री शनी महाराजांची प्राणप्रतिष्ठापना करून येथील भाविकांना दर्शनाचा लाभ घेता यावा म्हणून शुक्रवारी (दि. २६) श्री शनी महाराजांची प्राणप्रतिस्थापना सोहळा शेखर प्रकाश तांडेल व प्रियांका शेखर तांडेल यांच्या हस्ते मोठ्या झाला. या सोहळ्याला आमदार महेश बालदी यांनीही भेट देत दर्शन घेतले.

सलग तीन दिवस चालणाऱ्या या भक्तिमय मंगलमय सोहळ्यासाठी उरण तालुक्यासह नवघर परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थीत राहून या अदभूतपुर्व सोहळ्याचे शाक्षीदार होऊन या भक्तीमय सोहळ्यात तल्लीन होऊन श्रवण सुखाचा आनंद लुटला.

कार्यक्रमाचे व्यवस्थापक श्री शनी महाराज ट्रस्ट नवघर, बालाजी गृप नवघर, ग्रामस्थ मंडळ नवघर, आर.पी.गृप नवघर, ग्रामस्थ मंडळ नवघरपाडा आणि मित्रपरीवारांकडून चोख व्यवस्था करण्यात आली होती.

आमदार महेश बालदी यांच्यासह भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, नगरसेवक राजेश ठाकूर, उरण तालुका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड, कामगार नेते महेंद्र घरत, माजी जि. प. परिषद सदस्य जीवन गावंड, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, सीमा घरत मित्र मंडळी आणि नवघर ग्रामस्थ आदी उपस्थित होते.



# बॅटऱ्यांसह सामनाची चोरी

**पनवेल :** गॅरेजमध्ये प्रवेश करून अज्ञात चोरट्यांनी गॅरेजशेजारी असलेल्या ट्रकच्या चार बॅटऱ्या चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. अब्दुल खान याचे रोडपाली, कळंबोली येथे नॅशनल ऑटो इलेक्ट्रिशन नावाचे गॅरेज आहे. त्याच्यागॅरेजमध्ये प्रवेश करून चोरट्यांनी ट्रेलरचे मोटर स्टार्टर, लोडिंग बॅटरीसाठी लागणारी वायर चोरून नेली. तसेच गॅरेजशेजारी उभ्या असलेल्या दोन ट्रकच्या चार बॅटऱ्या चोरून नेल्या.

या प्रकरणी अज्ञात चोरांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# बांठिया हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थी मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीचे केशरचंदजी आनंदरामजी बांठिया माध्यमिक विद्यालय तसेच एन, एन. पालीवाला कनिष्ट महाविद्यालयामध्ये १९८३ पासून आजपर्यंत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांसाठी रविवार, दिनांक ५ मे २०२४ रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत सेक्टर १८, नवीन पनवेल येथील बांठिया हायस्कूलच्या विद्यासंकुलातील वातानुकुलीत साभगृहात माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात जास्तीत जास्त माजी विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन माजी विद्यार्थी समन्वय समितीने केले आहे.

शाळेत ज्ञान दानाचे महत्कार्य केलेल्या माजी मुख्याध्यापक, शिक्षक, प्राध्यापक आणि मान्यवरांचा हृद्यसत्कार या माजी विद्यार्थी मेळाव्यात करण्यात येणार आहे. त्याचबरोबर स्मरणिका प्रकाशन, खेळ, मानवतेवर आधारित नाटिका, करमणुकीचे सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहभोजन या कार्यक्रमासोबतच ग्रुप फोटो आणि सेल्फी साठी स्टॅन्ड उभारण्यात येणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी २५ माजी विद्यार्थ्यांची समन्वय समिती गठीत केली असून सर्व स्वयंसेवक विविध जबाबदाऱ्या पार पडत आहेत.

या नियोजित कार्यक्रमात उपस्थितीसाठी अजूनही ज्यांनी नोंदणी केली नाही अशा माजी विद्यार्थ्यांनी समितीचे प्रमुख रमेश यादव (९८७०२१७०७०), विनोद वाघमारे (९७०२५८०५०५), तुषार देशपांडे (९७६९६१३६८४), अमर शेळके ८६५२१२६००६, स्नेहा पाटील (९००२९२९७२८४), मधुरा तायडे (९९६७५९६००७), श्रीकांत म्हात्रे (७६६९५५५७७) यांच्याशी संपर्क साधावा, अशी माहिती समन्वय समितीने दिली.

शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी, नोकरी धंद्यासाठी किंवा इतर कारणासाठी दूर गेलेल्या आपल्या वर्ग मित्रांना पुन्हा एकदा या माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्ताने भेटता येणार आहे. या मनोमिलनाच्या, मैत्रीच्या, माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात मोठ्या संखेने उपस्थित राहावे, असे आवाहन के. आ. बांठिया हायस्कूल माजी विद्यार्थी समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय

# कांदा निर्यातीचा गोंधळ

कांद्याचे दर सर्वसामान्य ग्राहकांच्या दृष्टीने आवाक्यात रहावेत याकरिता केंद्र सरकारने गेला दीर्घकाळ कांदा निर्यातबंदीचे धोरण अनुसरले आहे. कांदा निर्यातीवरील बंदी आणि ती उठवण्यामागचे कारण दोन्ही कृषी अर्थशास्त्राशी निगडित आहे. कांदा उत्पादक शेतकरी आणि ग्राहक या दोघांनाही दिलासा मिळावा हाच या मागचा हेतू आहे.

**स्वयंपाकघरात एखाद्या गृहिणीस कांदा जसा रडवतो, तसाच तो ग्राहकांना व शेतकऱ्यालाही रडवत असावा. कांद्याच्या दराने उसळी घेतल्यामुळे जनसामान्य हवालदिल होतात, तर हे दर कोसळले की कांद्याला नगदी पीक मानणारा शेतकरी हवालदिल होतो. सरकारसुद्धा कांद्याची धास्तीच घेऊन असते. कांद्याच्या दरातील अशाच तेजीमुळे एकेकाळी दिल्लीतील सरकार कोसळले होते. मध्यंतरी कांद्याचे दर प्रचंड वधारल्यापासून केंद्रातील भारतीय जनता पक्षाचे सरकार कांद्याबाबत सावधपणाचे धोरण अनुसरते आहे. वास्तविक कांद्याबाबत सरकारला ग्राहक आणि शेतकरी या दोन्ही बाजूंना सांभाळावे लागते आहे. कांद्याचे दर सर्वसामान्य ग्राहकाला परवडण्याजोगे रहावेत या प्रयत्नांतच केंद्र सरकारने गेला काही काळ सातत्याने कांदा निर्यातबंदीच्या उपाययोजनेचा वापर केला आहे. शेतकरी वा व्यापारी यांच्याकडून निर्यातबंदी उठवण्यासाठी दबाव येऊ लागला की सरकार कांदा निर्यातबंदी उठवते, परंतु निर्यातशुल्कात वाढ करते, जेणेकरून निर्यातीचे प्रमाण मर्यादित राहून देशात कांद्याचे भाव स्थिर राहतील. कृषी अर्थशास्त्र समजून-उमजूनच सरकार हे निर्णय घेत असते. सरतेशेवटी सरकारला कांदा उत्पादक शेतकरी आणि सर्वसामान्य ग्राहक या दोघांचेही हित सांभाळायचे असते, परंतु इतकी काळजी घेऊनही आता ऐन निवडणुकीच्या तोंडावर सरकारला कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या संतापाला तोंड द्यावे लागते की काय अशी परिस्थिती आहे. अर्थातच, विरोधक याचा निवडणुकीतील राजकारणासाठी पुरेपूर वापर करीत आहेत. निवडणुकांच्या तोंडावर कांद्याचे भाव आटोक्यात ठेवण्यासाठी खरेतर केंद्र सरकारने मार्च महिन्यात कांदा निर्यातबंदीला मुदतवाढ दिली, परंतु गुजरातमध्ये पिकवलेला पांढरा कांदा निर्यात करण्याची परवानगी केंद्र सरकारने दिल्यानंतर देशभरात खळबळ उडाली. ही परवानगी दोन हजार टन कांद्याच्या निर्यातीसाठी होती. या निर्णयामुळे ऐन निवडणुकीच्या काळात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. विरोधकांनी लागलीच त्याचा गुजरातला झुकते माप दिले जाते आहे असा समज पसरवण्यासाठी वापर सुरू केला, परंतु त्यात काही तथ्य नाही. त्यापाठोपाठ ९९ हजार टन कांदा निर्यात करण्याची परवानगी केंद्र सरकारने दिल्याची बातमी आली. या बातमीमुळे देशाच्या काही भागांत जल्लोष झाला तर काही ठिकाणच्या शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला, परंतु येथेही सरकारची विशिष्ट परिस्थिती समजून घेण्याची गरज आहे. सरकारनेही हे वास्तव लोकांसमोर आणले पाहिजे. शेतकऱ्यांना मदत म्हणून शेजारील निवडक देशांकरिता, ज्यात बांगलादेश, भूतान, बहारिन, मॉरिशस, संयुक्त अरब अमिराती, श्रीलंका यांचा समावेश आहे. सरकारने विशिष्ट कोटा ठरवून देऊन एक लाख टन कांदा निर्यातीला परवानगी दिली, पण याविरोधातही निवडणुकांमुळे अंशत: कांदा निर्यातीला परवानगी दिल्याची टीका होते आहे. वास्तवत: कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे. सध्या आचारसंहिता लागू असल्यामुळे सरकार कोणत्याही नव्या निर्यातीला परवानगी देऊ शकत नाही. सहा देशांना कांदा निर्यात करण्याचे पत्रक गेल्या महिन्यातले आहे, परंतु या गोंधळामुळे शेतकऱ्यांमध्ये गैरसमज पसरला असल्यास त्याचे तातडीने निवारण होण्याची गरज आहे.**

# महाबळेश्वर, वरंध घाटाचे काम पावसाळ्याआधी व्हावे







**खबरबात**
**महेश शिंदे**

पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणाला जोडणारे महाबळेश्वर आणि वरंध असे दोन्ही घाट वाहतुकीस धोकादायक बनले आहेत. सन २०२१च्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेला रस्ता या वर्षीदेखील डेंजर झोनमध्ये असून घाटातील दुरुस्तीच्या कामांना सार्वजनिक बांधकाम विभाग राष्ट्रीय महामार्ग विभागाने आता युद्धपातळीवर सुरुवात केली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील सातारा आणि पुणे या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या महाबळेश्वर आणि वरंध भोर घाटाची सन २०२१मधील अतिवृष्टीमध्ये मोठी हानी झाली. दोन्ही घाटात मोठ्या प्रमाणावर दरडी कोसळल्याने हे घाट पूर्णपणे वाहतुकीस बंद झाले होते. संपूर्ण घाटात दरडी कोसळून घाटमार्ग तब्बल सहा महिने बंद होता. अनेक ठिकाणी भूस्खलन आणि भेगा पडल्याने महाबळेश्वर आणि वरंध घाट वाहतुकीस धोकादायक बनला. या भेगा, रस्त्यावर आलेल्या दरडी, मातीचा भराव हटवून तात्पुरत्या स्वरूपात दुरुस्ती करण्यात आली होती. दोन्ही घाटात महाड सार्वजनिक बांधकामाने काही अंशी कामे करून घाटातील वाहतूक सुरळीत केली होती.

वरंधा घाट हा राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे सुपूर्द केला आहे, तर महाबळेश्वर घाटात महाबळेश्वर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत आलेल्या मार्गाची पूर्णत: दुरूस्ती बाकी आहे. ठिकठिकाणी कामे सुरू असून मातीचा भराव या पावसाळ्यात पुन्हा रस्त्यावर येण्याची शक्यता या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या पर्यटकांच्या व स्थानिक माल वाहतूकदारांच्या बोलण्यातून स्पष्टपणे जाणवत आहे.

सन २०२४चा पावसाळा सुरू होण्यास फक्त एक महिन्याचा कालावधी शिल्लक असताना ही कामे अद्याप चालू आहेत. महाबळेश्वर घाटातील प्रतापगडपासून महाबळेश्वरपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झाले आहे, तर रस्त्यावरील २०२१च्या नैसर्गिक आपत्तीमध्ये ज्या नदी, नाल्यांवरील मोठ्या व लहान पुलांचे प्रमाणावर नुकसान होऊन ते क्षतिग्रस्त झाले होते त्यांची कामे अत्यंत धीम्या गतीने चालू आहेत. उन्हाळ्यात येणाऱ्या पर्यटकांमुळे घाटमार्ग दुरुस्त करता आला नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने म्हटले आहे. या घाटात रस्त्यावर आलेल्या दरडी हटवण्यात आल्या असल्या तरी रस्त्याला लागून असलेल्या दगडी आणि माती अद्याप काही ठिकाणी हटवण्यात आलेली नाही. महाबळेश्वर सार्वजनिक बांधकाम उपविभागाने दुरुस्तीच्या कामाला युद्धपातळीवर काम सुरू केली आहे. यामध्ये प्रतापगडपासून महाबळेश्वरपर्यंतच्या रस्त्याचे नव्याने डांबरीकरण सरंक्षक भिंती, गॅबियन पद्धतींच्या भिंती, नालेसफाई आदींचा समावेश आहे. अवाढव्य स्वरूपात आलेल्या मातीच्या आणि दगडी दरडी पाहता सद्यस्थितीत बांधत असलेल्या सरंक्षक भिंती आणि गॅबियन भिंती पावसात तग धरणे आवश्यक आहे.



महाड-वरंध-भोर-पुणे-पंढरपूर हा ब्रिटीशकालीन मार्ग आहे. महाड आणि भोरमध्ये व्यापार, दळणवळण करणे स्थानिक जनतेला सोपे जाते. या मार्गावर असलेल्या घाटामुळे माझेरी, पारमाची पुढे भोर हद्दीतील शिलीम कुंड, राजीवडी, हिरडोशी, साळुंगण, उंबर्डेवाडी, शिरगाव या गावातील ग्रामस्थांना खरेदीसाठी बिरवाडी आणि महाडमध्ये येणे शक्य होते. शिवाय वैद्यकीय सुविधेसाठीदेखील बिरवाडी आणि महाडला येणे जवळ आहे. वरंध घाटातून एसटी बस सुविधा असल्याने महाडला येणे आणि जाणे शक्य होत होते. पुणे प्रवासाचे अंतर कमी तासाचे असल्याने भाजी विक्रेते, एसटी बसेस, किरकोळ विक्रेते, पर्यटक याच मार्गाचा वापर करीत आहेत. घाटातील सौंदर्यदेखील ऐन पावसाळ्यात पाहण्याजोगे असते. यामुळे पर्यटनालादेखील चालना मिळत गेली. यामुळे भोर, महाड सीमेवरील गावांतील ग्रामस्थांना यामुळे रोजगारदेखील प्राप्त झाला आहे, मात्र दरवर्षी या घाटात सातत्याने दरडी कोसळत असल्याने हा मार्ग धोकादायक बनतो. त्यातच आता दुरुस्तीच्या आणि रुंदीकरणाच्या कामासाठी हा महामार्ग वाहतुकीसाठी बंद केल्याने या परिसरातील नागरिकांची व मालवाहतूकदार भाजीपाला वाहतूकदार यांची मोठ्या प्रमाणावर कोंडी होत आहे. या घाटाच्या दुरुस्तीचे काम अद्याप पूर्ण होणे बाकी आहे. हा महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतरित केला गेला आहे.

महाबळेश्वर घाटात सन २०२१च्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीने नुकसान झाले होते. सातारा जिल्ह्याच्या प्रतापगडच्या हद्दीपासून महाबळेश्वरपर्यंतच्या रस्त्याच्या नव्याने डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले असले तरी पुढील वर्षी या राष्ट्राचे काँक्रीट करण्याचे काम हाती घेतले जाईल. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग महाबळेश्वरचे उपविभागीय अभियंता अजित देशपांडे यांना विचारले असता त्यांनी या गोष्टीला दुजोरा दिला, मात्र आधीच पर्यटनाच्या दृष्टीने थंड हवेचे ठिकाण असणाऱ्या महाबळेश्वरला सध्याचे तापमान ३६ ते ३९ अंश डिग्रीपर्यंत असल्याने पर्यटकांनी महाबळेश्वरकडे पाठ फिरवली आहे. त्यातच महाबळेश्वर पाचगणी व वाईमध्ये मोठ्या प्रमाणावर सिमेंट काँक्रीटच्या हॉटेल व लॉजिंग बोर्डिंगसाठी असणाऱ्या इमारती व स्थानिक रहिवाशांनीदेखील सिमेंट काँक्रीटच्या इमारती उभारल्याने महाबळेश्वरमधील थंड हवेचे प्रमाण कमी झाले आहे. त्यातच पोलादपूर तालुक्यापासून महाबळेश्वरपर्यंतच्या ४० किलोमीटरच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण झाल्यास येथील तापमानात मोठ्या प्रमाणावर वाढ होऊ शकते. त्या दृष्टीने उपाययोजना व्हाव्यात.

## बदलते तंत्रज्ञान

# इलेक्ट्रिक स्कूटरची बॅटरी खराब झाल्यास मिळतात संकेत

सध्या भारतात दर महिन्याला मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक स्कूटर खरेदी केल्या जात आहेत. अलिकडे सर्वत्र इलेट्रिक बाईकचा वापर वाढू लागला आहे. ग्राहकांची पसंती या वाहनाला मिळत असल्याचे दिसून येत आहे, परंतु काही लोकांच्या निष्काळजीपणामुळे स्कूटरची बॅटरी खराब होते. बॅटरी खराब झाल्यावर कोणते संकेत मिळतात हे जाणून घेऊया...



सामान्यपेक्षा वेगळा आवाज : जर इलेक्ट्रिक स्कूटर चालवताना नेहमीपेक्षा वेगळा आवाज येत असेल, तर ते स्कूटरच्या बॅटरीमध्ये समस्या असल्याचे लक्षण असू शकते. कधीकधी अंतर्गत शॉर्ट सर्किटचा धोका असतो आणि कधीकधी बॅटरी जास्त गरम होते तेव्हा नेहमीपेक्षा वेगळा आवाज येतो.

मंद प्रकाश : स्कूटर चालवताना दिव्यांची चमक लक्षणीयरीत्या कमी झाल्यास किंवा बॅटरी क्षमतेनुसार चार्ज होत नसेल तर बॅटरीचे आयुष्य संपत आले आहे समजावे. तुमच्या इलेक्ट्रिक स्कूटरला वरीलपैकी कोणतीही लक्षणे जाणवत असल्यास लगेच बॅटरी बदलावी.


स्कूटर लवकर सुरू न होणे : इलेक्ट्रिक स्कूटर सुरू करण्यात अडचण येत असेल किंवा सुरू व्हायला खूप वेळ लागत असेल, तर स्कूटरच्या बॅटरीमध्ये काही समस्या असू शकते. बॅटरीचे आयुष्य संपल्यामुळे स्कूटर लवकर सुरू होत नाही.

बॅटरी लीक होणे : अनेक वेळा जेव्हा स्कूटरची बॅटरी खराब होते तेव्हा ती एकतर फुगते किंवा लीक होते. अशा दोन्ही परिस्थितीमध्ये स्कूटर आणि प्रवासी धोक्यात येऊ शकतात. कारण अशा स्थितीत बॅटरीचा स्फोट होण्याचा धोका जास्त असतो. असे झाल्यास गंभीर दुखापतही होऊ शकते.

स्कूटर सारखी थांबणे : अनेक वेळा स्कूटर थोड्या अंतरावर जाऊन थांबत असेल तर बॅटरीचे आयुष्य संपले आहे समजावे. तसेच चार्जिंग करून देखील असा त्रास होत असेल तर इलेक्ट्रिक स्कूटरची बॅटरी बदलावी.

(टीप : सदर लेख फक्त सामान्य माहितीसाठी आहे. अधिक तपशीलांसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे.)

# भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके



**निमित्त**

धुंडिराज गोविंद फाळके ऊर्फ दादासाहेब फाळके हे चित्रपटनिर्मिती करणारे महाराष्ट्रातील व भारतातील पहिली व्यक्ती होते आणि यासाठीच त्यांना भारतीय चित्रपटांचा जनक मानले जाते. १९१३ साली त्यांनी निर्माण केलेला राजा हरिश्चंद्र हा मूक चित्रपट मराठी व भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील आद्य चित्रपट होय. १९३७पर्यंतच्या आपल्या १९ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी ९५ चित्रपटांची व २६ लघुपटांची निर्मिती केली. भारतीय अभिनेत्यांना त्यांच्या जन्मभरच्या चित्रपटविषयक योगदानाबद्दल भारतीय चित्रसृष्टीतील दादासाहेब फाळके पुरस्कार हा सर्वांत मोठा पुरस्कार दिला जातो. आज जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा...

दादासाहेब फाळके यांचा जन्म नाशिकमधील त्र्यंबकेश्वर येथे झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध संस्कृत तज्ज्ञ होते. इ.स. १८८५ साली त्यांनी सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथे प्रवेश घेतला. १८९० साली ‘जे.जे.’तून उत्तीर्ण झाल्यावर ते कला भवन, बडोदा येथे शिल्पकला, तंत्रज्ञान, रेखाटन, चित्रकला, छायाचित्रणकला इत्यादी गोष्टी शिकले. त्यांनी गोध्रा येथे छायाचित्रकार म्हणून व्यवसाय सुरू केला, परंतु प्लेगच्या उद्रेकात त्यांची प्रथम पत्नी आणि मूल दगावल्यावर त्यांना ते गाव सोडावे लागले. लवकरच त्यांची ल्युमिएर बंधूंनी नेमलेल्या ४० जादूगारांपैकी एकाशी, जर्मन कार्ल हर्ट्झ याच्याशी ओळख झाली. त्यानंतर त्यांना भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण संस्थेसाठी ड्राफ्ट्समन म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या धडपड्या स्वभावामुळे लवकरच ते नोकरीच्या बंधनांना कंटाळले व त्यांनी छपाईचा व्यवसाय सुरू केला. शिळाप्रेस छपाईच्या तंत्रात ते वाकबगार होते. त्यांनी राजा रविवर्मांसोबत काम केले. पुढे स्वतःचा छापखाना काढला तसेच छपाईची नवी तंत्रे आणि यंत्रे अभ्यासायला जर्मनीची वारी केली. पुढे लाईफ ऑफ ख्रिस्त हा मूकपट पाहिल्यानंतर त्यांनी आपले लक्ष हलत्या चित्रांच्या व्यवसायाकडे वळवले व १९१२ साली त्यांनी राजा हरिश्चंद्र हा पहिला मूकपट काढला. तो ३ मे १९१३ या दिवशी मुंबईच्या कॉरोनेशन चित्रपटगृहात प्रेक्षकांना पहिल्यांदा दाखवण्यात आला.

सरस्वतीबाई या दादासाहेब फाळके यांच्या पत्नी. दादासाहेबांचा पहिला चित्रपट बनवण्यात त्यांचा मोलाचा सहभाग होता. चित्रपटाच्या निर्मितीखर्चासाठी सरस्वतीबाईंनी आपले सोन्याचे दागिने विकले. त्या फिल्म डेव्हलपिंग, मिक्सिंग आणि फिल्मवर रसायनांचा उपयोग शिकल्या.

भारतीय इतिहासातील महान व्यक्तिमत्त्व असलेल्या श्रीकृष्णाच्या जीवनावरही असाच चित्रपट बनवायचा ध्यास घेऊन अथक प्रयत्नांनी त्यांनी लंडनला जाऊन चित्रपटविषयक तांत्रिक ज्ञान मिळवले. तेथून परतल्यानंतर मुंबई (दादर) येथे फाळके चित्रपटनिर्मितिगृहाची स्थापना केली आणि सहा महिन्यात मुंबईच्या कोरोनेशन चित्रपटगृहामध्ये त्यांनी निर्मिलेला राजा हरिश्चंद्र हा पहिला भारतीय बनावटीचा मराठी पूर्ण बोलपट प्रदर्शित झाला. या चित्रपटांनंतर त्यांनी मोहिनी भस्मासूर (१९१३), सत्यवान सावित्री (१९१४) या चित्रपटांची निर्मिती केली.

**क्लिक...क्लिक...!**



**बोर्लीपंचतन : श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर एका निवांत सायंकाळचे विलोभनीय दृश्य पर्यटकांना खुणावत आहे.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

# जेवणाची योग्य वेळ कशी ठरवायची?

सकाळी लवकर शाळेत जायचं म्हणून, तर ऑफिसला जाण्यासाठी लवकर उठायचं म्हणून आपल्यातील बरेच जण रोजच्या ठरलेल्या वेळेतच रात्रीचं जेवण करतात. काही जण ९, १० तर काही जण अगदी ११ वाजतासुद्धा जेवतात; तर काही जण भूक लागल्यावर जेवायला घेतात. अलिकडेच हृदयरोगतज्ज्ञ आणि लेखक, डॉक्टर बेल्ले मोनाप्पा हेगडे यांनी काटेकोर वेळापत्रकानुसार खाणे हा आपल्या आरोग्यासाठी सर्वोत्तम मार्ग असू शकत नाही, असे स्पष्ट केले आहे.



या विषयाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी व आहाराच्या या संकल्पनेचा अवलंब करताना आहारतज्ज्ञ आणि मधुमेह शिक्षक कनिक्का मल्होत्रा यांच्याशी चर्चा केली. त्या वेळी डॉक्टर म्हणाल्या की, आहाराचा समतोल राखण्याची एखादी वेळ ठरवा, असा सल्ला त्यांनी दिला आहे.

वेळापत्रकानुसार जेवणे : मधुमेह किंवा पूर्व मधुमेह असलेल्यांसाठी रक्तातील साखरेचे नियमन करू शकते. पचनास प्राधान्य देऊ शकते. ज्यामुळे अन्न प्रक्रिया सुरळीत होते. याची नकारात्मक बाजू पाहता ठरलेल्या वेळेत अन्नाचे सेवन केल्याने भुकेकडे दुर्लक्ष होते, यामुळे ठरवलेल्या वेळेत जास्त खाणे, चयापचय बिघडवणे आणि संभाव्यतः पचनास त्रास होऊ शकतो.

भूक लागल्यावर अन्नाचे सेवन करणे : आपल्या शरीराच्या नैसर्गिक संकेतांना प्रतिसाद देतो. पचनक्रिया आणि पोषक घटकांचे शोषण, मदत आणि चयापचय क्रियादेखील सुधारते. याची नकारात्मक बाजू पाहता व्यस्त शेड्यूलमुळे जेवण टाळल्यास नंतर जास्त प्रमाणात खाल्लं जातं आणि रक्तातील साखरेची पातळी विस्कळीत होऊ शकते.

जेवण व वजन व्यवस्थापन : खाण्याचे निश्चित वेळापत्रक असल्याने अति खाणे टाळता येते. यामुळे वजन कमी करण्यासही मदत होते तसेच वेगवेगळ्या शरीराच्या हालचाल किंवा चलनवलन स्तरावर आधारित आहाराचे सेवन करू शकता. ॲक्टिव्ह दिवसांमध्ये कमी खाऊ शकता किंवा विश्रांतीच्या दिवसांत जास्त खाऊ शकता. या वेळी कठोर वेळापत्रक आधुनिक जीवनशैलीसाठी नम्र ठरू शकते. हा दृष्टिकोन काहींसाठी उपयुक्त ठरू शकतो वा काहींसाठी नाही, पण आहार सेवनासाठी कोणतीही जादूची गोळी नाही. आरोग्यवर्धक आहाराच्या निवडींवर लक्ष केंद्रित करा व शरीराची हालचाल किंवा चलनवलनावर आधारित आहाराचा मार्ग निवडा.

# घड्याळाला मत म्हणजे मोदींना मत

## आमदार रविशेठ पाटील यांचे प्रतिपादन





**पेण : प्रतिनिधी**

पेण मतदारसंघात महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना जवळजवळ ५० हजाराचे मताधिक्य देण्याचे काम करणयाचे असून घड्याळाला मत म्हणजे नरेंद्र मोदींना मत हे सूत्र बाळगून कार्यकर्त्यांनी कामा करावयाचे आहे, असे आवाहन आमदार रविशेठ पाटील यांनी पाटणेश्वर येथे झालेल्या प्रचार सभेत कार्यकर्त्यांना केले.

रायगड मतदार संघातील महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ पेण मतदार संघात आमदार रविशेठ पाटील व माजी आमदार रविशेठ पाटील याच्या मार्गदर्शनाखाली ठिकठिकाणी प्रचारसभा सुरू असून पाटणेश्वर येथील देवस्थानच्या प्रांगणात झालेल्या छोटेखानी सभेस आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशिल पाटील, माजी जि प. सदस्य डी. बी. पाटील, भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, माजी सभापती परशुराम पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष दयानंद भगत, राष्ट्रवादी काँग्रेस युवक अध्यक्ष विकास पाटील, शिवसेना शहरप्रमुख दिनेश पाटील, माजी सरपंच नरेंद्र पाटील, तोरे सरपंच अमित पाटील, माजी सरपंच दिपाली पाटील, माजी सरपंच सुधाकर पाटील, माजी सरपंच किशोर पाटील आदींसह पाटणेश्वर, अंतोरे, नवघर येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी रविशेठ पाटील यांनी सांगितले की, येथील ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणात महायुतीला पाठींबा असून आता आपआपले हेवेदावे विसरून सर्वांनी कामाला लागायचे आहे. पुन्हा एकदा विकासाकडे आपल्याला वाटचाल करावयाची असून या माध्यमातून गावातील प्रलंबित सोडविण्याचे काम मी आणि धैर्यशिल पाटील मिळून करणार आहोत. पुन्हा एकदा मोदीजींना पंतप्रधान बनविण्यासाठी आपले उमेवार सुनील तटकरे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी कारावयाचे आहे, असे रविशेठ पाटील यांनी सांगितले.

या वेळी शिवसेना शहरप्रमुख दिनेश पाटील यांनी, गावातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्याचे तसेचशहरी भागातून येणारे सांडपाणी व बेरोजगार युवकांचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी या वेळी उपस्थित मान्यवरांकडे केली. भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, माजी जि.प. सदस्य डी. बी. पाटील, नरेश पाटील आदींनीही आपले मनोगत व्यक्त केले.

### ‘नरेंद्र मोदींना पंतप्रधानपदी पुन्हा विराजमान करायचेय’

*या वेळी माजी आमदार धैर्यशिल पाटील यांनीही सांगितले ज्या व्यक्तीची नितीमत्ता हि जनतेशी जोडली आहे. गेली १० वर्षे जनतेच्या प्रश्नाची सोडवणूक करून देशाला प्रगतीपथावर नेण्याचे काम ज्या नेत्यांनी केले त्या नेत्याला पुन्हा एकदा पंतप्रधानपदी विराजमान करण्याचे काम आपणाला करावयाचे आहे. युवक अध्यक्ष विकास पाटील यांनी युवकांचा वाढत प्रतिसाद पेण तालुक्यातून मिळत असून ना. आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून युवकांचे प्रश्न सोडविण्याचे काम मागील काळात झाले असून यापुढेहि कामे होतच राहणार पेण तालुक्यातून मोठा प्रमाणांत युवकांचे मताधिक्क्य मिळवून देऊ असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.*

# मुरूडमधील आजचे लोडशेडिंग अखेर रद्द

**मुरूड :** मुरूड महावितरणमार्फत मंगळवारचे लोडशेडिंग जाहीर करण्यात आले होते, परंतु सध्याचे निवडणुकीचे महत्त्वाचे दिवस व लोक आग्रहास्तव मंगळवारी होणारे सकाळी १० ते सायंकाळी ५ चे लोडशेडिंग रद्द करण्यात आल्याची माहिती मुरूड महावितरणचे उप कार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांनी दिली होती.

मुख्य वाहिनीवर येणाऱ्या वृक्षाची तोड करणे, झम्परची कामे पूर्ण करण्यासाठी भारनियमन करण्यात येणार होते, परंतु सध्याचे तापमान सुद्धा वाढल्याने वीज ग्राहक हैराण असतानाच लोकांकडून हे भारनियमन रद्द करण्यात यावे, अशी मागणी जनतेमधून होऊ लागली होती. याचा सारासार विचार करून मुरूड महावितरणने मंगळवारी होणारे भारनियमन रद्द करण्यात आले आहे.

मंगळवारचे भारनियमन रद्द झाल्याबद्दल वीज ग्राहक व शिवसेनेचे मुरूड तालुका संघटक दिनेश मिणमिने यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# शिक्षकांनी वेळेची व विचारांची गुंतवणूक करावी –डॉ. चक्रदेव



**कर्जत : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० चांगले आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प तयार करणे आवश्यक आहे. शिक्षकांची वेळेची व विचारांची गुंतवणूक लागते. शिक्षकांनी सुध्दा विद्यार्थ्यांबरोबर सहपाठी राहिले पाहिजे, असे महत्वपूर्ण प्रतिपादन एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांनी येथे केले.

सेवा सहयोग फाऊंडेशन विद्यार्थी विकास योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या हस्ते फीत कापून इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी लीना देवस्थळी, सेवा सहयोग फाऊंडेशनचे प्रवर्तक रवींद्र कर्वे, अभिनव ज्ञान मंदिर संस्थेचे अध्यक्ष गणेश वैद्य, कार्याध्यक्ष श्रीराम पुरोहित, उपाध्यक्ष अरुण धारप, सचिव नंदकुमार मणेर, खजिनदार पद्माकर गांगल, ठाणे जनता सहकारी बँके अध्यक्ष शरद गांगल आदी उपस्थित होते.

या वेळी वास्तू विशारद ब्रीद जगताप, ठेकेदार रामभाऊ वाघमारे आणि इमारतीचे काम चांगल्या प्रकारे व्हावे यासाठी लक्ष ठेवणारे सुहास थावरे यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. मिताली मुसळे व सविता हाके यांनी सूत्रसंचालन केले. नंदकुमार मणेर यांनी आभार प्रदर्शन केले. या वेळी गोविंद पारटकर, अशोक बोरगावकर, शिरीष चाक्रदेव, विक्रम वैद्य, नाखरे, किशोर मोघे, राजू हापूर्दे, माधव जोशी, नंदू जोशी, विवेक सुर्वे, अनिल जोशी, महेश फणसे, रणजीत जैन, राजेश ओसवाल, राजन करेकर, अजित पेंढारकर, अरुण करमरकर, रवींद्र खराडे, अंजली गांगल, संजय आचार्य, अनिल जोशी, गोविंद पारखकर, महेश वैद्य, जयश्री कुलकर्णी, मकरंद मुळे, प्रमोद घोलप, अभय शेवडे, महेश फणसे, जयश्री वैशंपायन, कालिंदी गोखले, शोभा पटवर्धन आदी उपस्थित होते.

# पोलीस व निमलष्करी दलाचे संचलन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अनिल जाधव आणि पोलीस कर्मचारी तसेच गोरखा निमलष्करी दलाच्या दोन प्लॅटून्सचे दुपारी साडेतीन वाजता तालुक्यातील कापडे आणि चार वाजता पोलादपूर शहरामध्ये ४० अंश तापमानात संचलन करण्यात आले.

पोलादपूर तालुक्यात नागरिकांनी निर्भयपणे मतदान करण्यासाठी प्रवृत्त व्हावे यासाठी पोलादपूर पोलीस ठाण्याचे निरिक्षक अनिल जाधव आणि सहकारी तसेच गोरखा निमलष्करी दलाच्या दोन प्लॅटून्सद्वारे संचलन करून निवडणूक सुसज्ञता दर्शविण्यात आली.

दुपारी टळटळीत उन्हात गोरखा निमलष्करी दलाचे दोन सशस्त्र प्लॅटून्स आणि पोलादपूर पोलीस ठाण्याचे सुमारे २० हून अधिक कर्मचारी या संचलनामध्ये सहभागी झाले.

कापडे येथे महाबळेश्वर रस्ता आणि कापडे कामथे रस्त्यावर संचलन केल्यानंतर हे सर्व पोलीस आणि निमलष्करी दलाचे गोरखा जवान पोलादपूर येथील जुना महाबळेश्वर रस्त्यावरून पिंपळपार मारूतीजवळून भैरवनाथ नगर सहाणेवर गेले तेथून आनंदनगर येथून युनियन बँकेलगतच्या रस्त्यावरून मुख्य बाजारपेठेतून महाबळेश्वर पोलादपूर रस्त्यावरून छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळयाजवळून सैनिकनगरमार्गे संचलन करून या गोरखा प्लॅटून्सना पुढील शहरामध्ये संचालनासाठी निरोप देण्यात आला.




अ‍ॅड. आशा अरुणकुमार भगत
मोबाईल क्रमांक ८१०८३५५०००
गुण्णाल साहेब

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दि.चौ. अर्ज क्र. २८०/२०२४
निशाणी क्रमांक ७/ ड
ने.ता. १९/६/२०२४

१. श्री. सुनित कृष्णा पवार
रा.२०१ शुभ सागर को हौं सो
प्लॉट २१२ सेक्टर २१ कामोठे
२.श्री. अमीत कृष्णा पवार
रा.अे/२०३ श्री कृष्ण को ऑ हौं सो
प्लॉट ५७ सेक्टर ३४ कामोठे
३. श्री. अजित कृष्णा पवार
रा. डी १०३ यशराज कॉम्प्लेक्स
प्लॉट १ सेक्टर १६ कामोठे

सदरहु अर्जदार यांचे वडिल कै. कृष्णा मालजी पवार हे दिनांक १०/०५/२०१७ रोजी मिलेनियम हॉस्पीटल कामोठे मयत झाले आहेत. कै. कृष्णा मालजी पवार यांची पत्नी कै. अनिता कृष्णा पवार ही दिनांक ०७/०८/२०२३ कामोठे येथे मयत झाली आहे व कै. कृष्णा मालजी पवार यांची आई कै. विठाबाई मालजी पवार ही दिनांक ही दिनांक १०/०२/१९९९ मुंबई येथे मयत झाली आहे.

कै. कृष्णा मालजी पवार यांच्या पश्यात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणुन नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब कै. कृष्णा मालजी पवार यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरहु अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे–

कै विठाबाई मालजी पवार (मयत मुळ पुरुषाची मयत आई)
↓
कै. कृष्णा मालजी पवार (मयत मुळ पुरुष) कै. अनिता कृष्णा पवार (मयत मुळ पुरुषाची पत्नी
↓
श्री. सुनित कृष्णा पवार (मयत मुळ पुरुषाचा मुलगा)
↓
श्री. अमित कृष्णा पवार (मयत मुळ पुरुषाचा मुलगा)
↓
श्री. अजित कृष्णा पवार (मयत मुळ पुरुषाचा मुलगा)

१. सदरहु कै. कृष्णा मालजी पवार व ईतर यांच्या मृत्युसमयी त्यांच्या नावाची नोंद असलेल्या सदनीकेचे वर्णन येणेप्रमाणे

**मौजे कामोठे तालुका पनवेल येथिल सदनिकेचे वर्णन**

| अपार्टमेंटचे नाव व क्रमांक | प्लॉट क्रमांक | सेक्टर क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|---|---|
| शुभ सागर सदनिका क्रमांक २०१ | २१२ | २१ | ९,९९,०००/– |

सदर मिळकतीस चतुः सिमा खालिलप्रमाणे आहेत :
१. पुर्वेस : भुखंड कमांक २११ | २. पश्चिम भुखंड क २१३ (ESS)
३. उत्तरेसः भुखंड क्रमांक २१७ | ४. दक्षिणेस ११ मीटरचा रस्ता

२. परंतु सदरची व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदारांनी सिडको कार्यालयाकडे चौकशी केली असता असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे मिळकत आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात म्हणजेच कै. कृष्णा गालजी पवार यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर सदनिका हस्तातरण करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रीक बाबींचा अडथळा येवु नये हया कारणास्तव वरील मयत व्यक्तिंचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करुन मागत आहेत सबब सदर अर्जास कारण घडले आहे.

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तकार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे.

**सही/–**
**व. लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सह. अधीक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# दिव्यांग मतदारांमध्ये प्रशासनाकडून जनजागृती



**पेण : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदार संघातील १९१ पेण विधानसभा मतदारसंघांमध्ये पेण नगरपरिषद व तालुका स्वीप पथकाच्या संयुक्त विद्यमाने पेण नगरपरिषद सभागृह येथे दिव्यांग मतदारांमध्ये जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमास पेण तालुक्यातील १७५ दिव्यांग मतदार उपस्थित होते. तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी सांगितले की, दिव्यांग मतदारांना मतदानाच्या दिवशी देण्यात येणाऱ्या सोयी सुविधाबाबत प्रशासन तत्परतेने कमी करणार असून जास्तीत जास्त मतदाराने मतदान करणे गरजेचे आहे.तर स्वीप पथकाचे विनायक पवार यांनी दिव्यांग मतदारांना मतदानाच्या दिवशी सुट्टी न घेता प्रथम प्राधान्याने मतदान करावे मतदारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता मतदान केले पाहिजे.

या वेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी जीवन पाटील, स्वीप पथकामधील प्रवीण बैकर, महेश शेंड्गे, मिलिंद महांगडे आदी उपस्थित होते.

# राजपुरी येथे आज खासदार तटकरे यांची जाहीर सभा

**मुरूड :** खासदार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ मंगळवारी (दि. ३०) राजपुरी येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय जनता पक्षाने या विशेष सभेचे आयोजन राजपुरी कोळीवाडा परिसरात केले आहे. सभा संपल्यावर बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. शेकडोच्या संख्येने बाईकस्वार या बाईक रॅलीत सहभागी होणार आहेत.

बाईक रॅलीनंतर माळी समाज मंदिर येथे आर. पी.आय कार्यकत्यांशी बैठक होणार आहे. दुपारी ३ वाजता बोर्ली येथे जाहीर सभा व त्यानंतर सायंकाळी ५ वाजता शिरगाव साई मंदिर येथील भव्य पटांगणावर जाहीर सभा होणार आहे. कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000031094** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-12/ 2024-2025.** RFx E-tender for Hiring of MMV vehicle at EHV Lines Maint S/sdn Panvel-II under EHV (O&M) Division Panvel for period 01.06.2024 to 31.03.2025.....**2nd call.** **Tender amount Rs. 4,99,920/-,** **EMD amount Rs. 4,999/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **30.04.2024, 18:00 Hrs. to 07.05.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 07.05.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **08.05.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड येथील वामन कमळू पाटील व इतर यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

**परीशिष्ट**
**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे वाजे, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| वामन कमळू पाटील<br>धोंडू कमळू पाटील<br>भागवत कमळू पाटील<br>चांगा कमळू पाटील<br>विमल कान्हा गवळी<br>गणीबाई बाळाराम देशेकर<br>चंद्रभागा कमळू पाटील<br>ज्ञानेश्वर कमळू पाटील | ७० | – | ०–३८–००<br>पो.ख. ०–०३–००<br>०–४१–०० | ६.९४ |

सबब वर नमुद परीशिष्ट शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अ‍ॅटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तकार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : २९/०४/२०२४

**सही/–**
**विजय भगत अ‍ॅन्ड असोशिएटस्**
(अ‍ॅडव्होकेट अ‍ॅन्ड लिगल कन्सलटंट)
शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स,
पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email.vijaybhagat43@gmail.com

# पंतप्रधान नरेंद्र मोदी वैश्विक नेते

## आमदार मंदा म्हात्रे यांचे प्रतिपादन



**नवी मुंबई : बातमीदार**

मोदी हे वैश्विक नेते म्हणून गणले जात असल्याचे हे द्योत्तक आहे, असे प्रतिपादन आमदार मंदा म्हात्रे यांनी नमो संवाद कॉर्नर सभेमध्ये केले. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने छोट्या छोट्या कॉर्नर सभांच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधला जावा याकरिता बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली नेरूळ व वाशी या दोन्ही ठिकाणी शनिवारी (दि. २७) नमो संवाद कॉर्नर सभा मोठ्या उत्साहात झाली. कामगार आघाडीच्या सुहासिनी नायडू यांनी या सभेचे आयोजन केले होते.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले कार्य म्हणजे गरीब जनतेकरिता प्रत्येक पैसा गरीब कल्याणासाठी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गासाठी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थामध्ये १० टक्के आरक्षण, अमृत योजना, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, जल जीवन मिशन योजना, वन नेशन वन रेशन कार्ड योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना अशा अनेक योजना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब, तळागाळातील जनतेसाठी व शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देशभरातील कोट्यवधी जनतेला दिलासा मिळाल्याचे सांगितले. तसेच प्रत्येक विभागातील समस्यांजाणून घेत स्थानिक नागरिकांसोबत संवाद साधला. या वेळी अबकी बार ४०० पार अशा घोषणा दिल्या.

या वेळी ठाणे लोकसभा निवडणूक सह प्रमुख व माजी जिल्हाध्यक्ष तथा वक्ता रामचंद्र घरत, माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे, प्रदीप गवस, सुहासिनी नायडू, अंजली वाळूंज, दत्ता घंगाळे, चंद्रशेखर भोपी, मकरंद म्हात्रे, शंतनू भोपी, विजय वाळूंज, अजय वाळूंज, प्रताप बोसकर, रामकृष्ण अय्यर, शशी नायर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# उलवे नोड येथे खासदार श्रीरंग बारणे यांच्या रॅलीचे जोरदार स्वागत







**उरण : वार्ताहर**

उरण विधानसभा मतदारसंघात आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार श्रीरंग बारणे, यांच्या प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी त्यांचे गव्हाण जिल्हा परिषदेमध्ये उलवे शहरात महायुतीच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले.

या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्य योगिता भगत, सुहास भगत, हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, कामिनी कोळी, उषा देशमुख, शिवसेने तर्फे गव्हाण विभागीय प्रमुख प्रभाकर पाटील, उलवे शहर प्रमुख अ‍ॅड. भरत देशमुख, संपर्कप्रमुख राजन म्हात्रे, मनोज घरत, सोनल घरत, राष्ट्रवादीचे अध्यक्ष संतोष काटे, मनसेचे शहर अध्यक्ष राहुल पाटील, शिवसेना महिला आघाडीच्या प्रमुख नंदिता म्हात्रे, श्वेता पाटील, अ‍ॅड. ऐश्वर्या पाटील, सुषमा कोळी, सुवर्णा कोळी व सहकाऱ्यांनी उमेदवार बारणे यांचे जोरदार स्वागत केले. या वेळी आमदार महेश बालदी, उपजिल्हाप्रमुख अतुल भगत ही उपस्थित होते.





**पनवेल : तालुक्यातील शिवाजीनगरमध्ये भक्तीपूर्ण वातावरणात सोमवारी गावजत्रा झाली. यानिमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कुलदैवत असलेल्या शिवाजीनगर येथील खंडोबाच्या मंदिराला भेट देत मनोभावे दर्शन घेतले. या वेळी शिवाजीनगर गाव अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, विजय ठाकूर, पी.के.ठाकूर, एकनाथ ठाकूर, सुजीत ठाकूर, शशीकांत ठाकूर, सागर ठाकूर, कुसूम ठाकूर, फुलवंती ठाकूर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.**



**पनवेल : तालुक्यातील न्हावाखाडी मोठा पाडा येथील देवीच्या जत्रेनिमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तेथील मंदिरात जाऊन दर्शन घेतले. या वेळी न्हावे सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच राजेश म्हात्रे, सदस्य सागर ठाकूर, मंदिर कमिटी अध्यक्ष सी.एल. ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, स्वप्नील ठाकूर, अमोघ ठाकूर, मदन ठाकूर, जी.के. ठाकूर, श्रीधर मोकल आदी उपस्थित होते.**













**पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ पनवेल परिसरात भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली वलप गावात महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी घरोघरी प्रचार केला. या वेळी वलप बूथ क्र.७३चे अध्यक्ष प्रभाकर पाटील यांच्यासमवेत वलप ग्रामपंचायतीचे सदस्य नवनाथ खुटारकर, संजोग पाटील, प्रतिक पाटील, चंद्रकांत पाटील, शशिकांत सांगडे, अनिल टेंभे, किशोर पाटील, प्रतिश पाटील, ओमकार रॅाय, सागर पाटील, मनिष पाटील, संजय पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**



# मनोजकुमार मौर्या, मंजुळ शुक्ला यांना नियुक्तीपत्र प्रदान





**खारघर : रामप्रहर वृत्त**

मनोजकुमार मौर्या यांची भाजप उत्तर भारतीय मोर्चा रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी, तर मंजुळ शुक्ला यांची उत्तर भारतीय मोर्चा उलवे अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

खारघर येथे झालेल्या उत्तर भारतीय समाजाच्या बैठकीत मौर्या व शुक्ला यांना भाजपचे उत्तर भारतीय प्रदेशाध्यक्ष डॉ. संजय पांडे, भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

या वेळी उत्तर भारतीय समाजाचे प्रदेश सरचिटणीस संतोष गुप्ता, रायगड जिल्हाध्यक्ष संतोषकुमार शर्मा, उत्तर भारतीय समाजाच्या नेत्या संतोषदीदी, संतोष त्रिपाठी, राजेश पांडे, शैलेश सिंग, आर. पी. पांडे, आर. के. त्रिपाठी, ऍड. इंदू दुबे, दीपक शिंदे, अमर उपाध्याय यांच्यासह उत्तर भारतीय समाजाचे नेते कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजप उलवे नोड उपाध्यक्ष अवधेश महतो यांच्यासह उत्तर भारतीय समाजाच्या अन्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मौर्या व शुक्ला यांचे अभिनंदन केले आहे.

# खासदार श्रीरंग बारणे यांचे पिरकोन येथे जंगी स्वागत



**उरण : वार्ताहर**

उरणचे आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ काढण्यात आलेल्या बाईक रॅलीचे पिरकोन गावात स्वागत करण्यात आले.

या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी उपसरपंच राजश्री म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य अनिता गावंड, माजी सरपंच व विद्यमान सदस्य के.वाय. गावंड, रायगड जिल्हा ओबीसी सचिव प्राध्यापक प्रमोद म्हात्रे, बुथ अध्यक्ष कमलाकर गावंड, जेष्ठ कार्यकर्ते नंदु गावंड, महेश गावंड, चंद्रकांत गावंड, गणेश महीला बचत गट अध्यक्ष लक्ष्मी गावंड, सचिव बिंदू गावंड, श्री गणेश महीला मंडळ सदस्या शारदा गावंड, उर्मिला गावंड, अक्षता गावंड, दिव्या गावंड आदी उपस्थित होते.

# मोहोचा पाडा गावात भीम जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वांगणी तर्फे वाजे ग्रामपंचायतमधील मोहोचा पाडा या गावात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती करण्यात आली होती.

या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य व भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्हा अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष अमित जाधव, पालीदेवद विभागीय अध्यक्ष किशोर सूरते, भाजप सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, सुकापूर ग्रामपंचायत सदस्य संजय पाटील, वांगणी तर्फे वाजेचे उपसरपंच प्रवीण म्हात्रे, विभागीय चिटणीस महेंद्र भोईर, विभागीय चिटणीस व माजी सरपंच गुरुनाथ भोईर व समता सागर बुद्ध विहार मोहोचा पाडाचे सर्व सभासद सोनावणे बंधू व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.



# डॉ. जहिर काझी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन-इ-इस्लामचे अध्यक्ष डॉ. झहीर आय काझी यांना भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रतिष्ठित पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. अंजुमन-इ-इस्लाम, शिक्षण आणि समाजकल्याणाच्या वचनबद्धतेसाठी प्रसिद्ध असलेला ट्रस्ट देशभरात एकूण ९७ शैक्षणिक आणि सामाजिक संस्था चालवतो.



डॉ. काझी यांचा पद्मश्री पुरस्कार शिक्षणाच्या प्रगतीसाठी आणि समुदायांच्या सशक्तीकरणासाठी त्यांचे अतुट समर्पण अधोरेखित करतो. डॉ. काझी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, अंजुमन-इ-इस्लाम हे ज्ञान आणि उत्कृष्टतेचे दीपस्तंभ म्हणून उदयास आले आहे, जे प्राथमिक शालेय शिक्षणापासून ते उच्च शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणापर्यंत अनेक प्रकारच्या शैक्षणिक संधी प्रदान करते.

# रेवदंड्यात शेकापला धक्का!

## कुंभारआळी ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश, महिलांचाही समावेश



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंड्यातील शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या कुंभार आळीतील ग्रामस्थ व महिलांनी ऐन लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांच्या कार्यप्रणाली व विकासकामांच्या झंझावातावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामुळे शेकापच्या बुरूजास सुरूंग लागला असून खऱ्या अर्थाने रेवदंड्यातील शिवसेनेची ताकद भक्कम होत वाढली आहे.

रेवदंडा ग्रामपंचायतीत शेकापला हमखास बहुमत देणाऱ्या कुंभार आळी ग्रामस्थ व महिलांचा पक्षप्रवेश कार्यक्रम येथील संत गोरा कुंभार समाज मंदिरात सोमवारी (दि. २९) झाला. या कार्यक्रमास आमदार महेंद्र दळवी, सरपंच प्रफुल्ल मोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे आशिष भट, उपसरपंच मंदाताई बळी, ग्रामपंचायत सदस्य दुशांत झावरे, आशाकमल नाखवा, दिक्षा बळी, शिवसेना महिला शहर अध्यक्ष शलाका राउत, कार्यकर्ते केदार खोत, योगेश पिटनाईक, समीर आठवले, विजय हाडकर, मन्सूर तांडेल, शैलेश गोंधळी, विवेक दांडेकर, हर्षल घरत, प्रसाद गोंधळी, भारती मोरे, गौरी मोरे, केतन झावरे, ताराचंद कोंड यांच्यासह रेवदंडा, थेरोंडा व चौल विभागातील ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



या वेळी शेकापच्या विद्यमान ग्रामपंचायत सदस्य लीना मानकर, कुंभार आळी प्रमुख प्रशांत मानकर, किशोर मानकर, राजेश मानकर, अनिल मुकादम, जगदीश मानकर या प्रमुख कार्यकर्त्यांसह ग्रामस्थ व महिलांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. आमदार महेंद्र दळवी यांनी शिवसेनेची भगवी शाल प्रदान करून सर्वांचे पक्षात स्वागत केले.

# खासदार सुनील तटकरे विकासाचा आश्वासक चेहरा

## ■ आमदार अनिकेत तटकरे यांचे प्रतिपादन

**रोहे : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक देशाची आहे. त्यामुळे आपला देश कोण चालविणार, कोणत्या पद्धतीने चालविणार हा देशहिताचा विचार करून आपण मतदान करणार आहोत. मागील दहा वर्षांत देशाचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे. आम्ही विकासाचे ध्येय घेऊन काम केले आहे. त्यामुळे आपण कुठल्याही भावनिक आवाहनाला साद न देता विकासकामांचा आश्वासक चेहरा व पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विचाराला मतदान करावे. रोहेकरांची सेवा करणाऱ्या खासदार सुनील तटकरे यांना सर्वाधिक मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन आमदार अनिकेत तटकरे यांनी केले आहे. ते रायगड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शिवसेना, भाजप, आरपीआयच, मनसे व मित्रपक्षांचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ रोहा अंधार आळी येथे आयोजित सभेत बोलत होते.

रायगड लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप, आरपीआय, मनसे व मित्रपक्षांचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ रोहा अंधार आळी येथे रविवारी (दि. २८) सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेस माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग, शिवसेना तालुकाप्रमुख मनोजकुमार शिंदे, शहरप्रमुख मंगेश रावकर, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, महिला शहर अध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, समीर सकपाळ, राजेंद्र जैन, अजित मोरे, पूजा पोटफोडे, जयश्री भांड, शिल्पा धोत्रे, श्रद्धा पाटणकर, मानसी दाते, समिधा सकपाळ, पूर्वा मोहिते, श्रद्धा घाग, सारिका पायगुडे, रुचिका जैन, चेतना पार्टे, रिया कासार, अशोक धोत्रे, रोशन चाफेकर, स्वरांजली शिर्के, ललित गुजर, श्री. तलवार आदी उपस्थित होते.

आपल्या भाषणात आमदार अनिकेत तटकरे म्हणाले की, आपल्याशी समरस होऊन आपल्या अडीअडचणीवेळी मदत करणारे कोण आहे हे पाहण्याची आवश्यक आहे. खासदार सुनील तटकरे हे रोहेकरांच्या पाठीशी ठामपणे उभे राहतात. रेल्वेसंदर्भातील प्रश्न त्यांनी सोडविले आहेत. यापुढेही केंद्र सरकारच्या योजना आपल्यापर्यंत आणण्यासाठी खासदार सुनील तटकरे यांना निवडून द्यायचे आहे.

संतोष पोटफोडे यांनी सांगितले की, पाच वर्षांत रोहा शहराच्या विकासासाठी खासदार सुनील तटकरे यांनी दीड कोटींचा निधी आणला आहे. नागरिकांना तो वेळोवेळी मदत करीत असतात. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करतात. त्यामुळे त्यांना रोहा शहरातून पाच हजारांचे मताधिक्य देणार आहोत.

मनोजकुमार शिंदे यांनी, केंद्र सरकारच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेसाठी विविध योजना राबविण्यात आले आहेत. खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून रोहा शहरात विकासकामे करण्यात आली आहे. विकासाचे महामेरू म्हणजेच सुनील तटकरे होय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी खासदार तटकरे यांना सर्वाधिक मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविकात अमित उकडे यांनी खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून विकासकामे झाली आहेत. समोरील उमेदवार फक्त निवडणूक आल्यावर रोह्यात येतात. त्यामुळे कार्यसम्राट खासदार तटकरे यांना भरघोस मताधिक्याने निवडून देऊया.

या वेळी मयुर दिवेकर, जयश्री भांड यांनीही मनोगत व्यक्त केले. सभेला मोठ्या संख्येने महायुतीचे कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.




# महामार्गावर माणगाव येथे वाहतूक कोंडी

**माणगाव : प्रतिनिधी**

शाळा–विद्यालयांच्या परीक्षा आटोपल्यानंतर नागरिकांची मुलाबाळांसह गावी जाण्याची लगबग सुरू झाली. त्यातच लग्नसराई सुरु झाल्याने नागरिकांनी गावाकडे कूच केली आहे, तर पर्यटकही तळकोकणात जाऊ लागले आहेत. त्यामुळे मुंबई–गोवा महामार्गावरील माणगाव बाजारपेठेत दोन्ही बाजूंनी वाहतूक कोंडी होत आहे. याचा फटका प्रवासी व वाहनचालकांना बसत आहे.

पुणे व पश्चिम महाराष्ट्रातून पर्यटक मोठ्या प्रमाणात पर्यटनासाठी रायगडात येत आहेत. दर शनिवार, रविवारी माणगाव बाजारपेठेत प्रवाशांना वाहतूक कोंडीची सामना करावा लागतो. वाहतूक कोंडी सोडविताना पोलिसांचीही दमछाक होते. बाजारपेठेला बायपास काढण्याचे काम गेले अनेक वर्षांपासून सुरू असून ते लवकर पूर्ण होण्याची आवश्यकता आहे.



## मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

**रायगड** : महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६५व्या वर्धापन दिनानिमित्त १ मे रोजी सकाळी ८ वाजता अलिबाग येथील पोलीस परेड ग्राऊंडवर महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे. मुख्य शासकीय समारंभ सकाळी ८ वाजता असल्यामुळे इतर कार्यालय अगर संस्था यांनी आपल्या कार्यालयात ध्वजवंदनाचा कार्यक्रम सकाळी ७.१५ वाजण्यापूर्वी किंवा सकाळी ९ वाजल्यानंतर करावा.

# खासदार सुनील तटकरेंना मोठे मताधिक्य देणार -आमदार महेंद्र दळवी

**मुरूड : प्रतिनिधी**

अलिबाग मुरूड विधानसभा क्षेत्रात शिवसेनेचे वर्चस्व असून येथून महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना मोठे मताधिक्य मिळवून देणार असल्याचे आमदार महेंद्र दळवी यांनी म्हटले आहे. काशीद येथे एका लग्न समारंभासाठी आले असताना ते पत्रकारांशी संवाद साधताना बोलत होते.



आमदार दळवी यांनी सांगितले की, कार्यसम्राट खासदार म्हणून खासदार सुनील तटकरे यांचा नावलौकिक आहे. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी ते नेहमीच आक्रमक व सजग राहिले आहेत. त्यांच्या पाच वर्षांच्या खासदारकीच्या कालावधीत कोट्यवधी रुपयांची विकासकामे त्यांनी रायगड लोकसभा मतदारसंघात केली आहेत. उत्तम वक्तृत्व व जनतेची सेवा करणारे व्यक्तिमत्व असल्याने यंदाच्या या निवडणुकीतसुद्धा जनमत त्यांच्यासोबत राहणार आहे.

अलिबाग मुरूड विधानसभा मतदारसंघात शिवसेनेची ताकद असून खासदार सुनील तटकरे यांना येथून मोठे मताधिक्य मिळवून देण्यासाठी सर्व कार्यकर्ते श्रम घेत आहेत. खासदार तटकरे यांच्या कामावर जनता खुश असून त्याचे प्रत्यंतर मोठे मताधिक्य मिळवण्यात होणार आहे. लोकसेवेचे व्रत घेऊन खासदार तटकरे या मतदारसंघात काम करीत आहेत. जनतेची नाळ त्यांच्यासोबत जोडली गेल्याने ते बहुमताने विजयी होतील, असा विश्वासही आमदार दळवी यांनी व्यक्त केला.

# झेडपीपीएलमध्ये रॉयल्स संघ विजेता




**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाडच्या ६२व्या वर्धापन दिनानिमित्ताने आयोजित झुंझार पोयनाड प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आर. जे. रॉयल्स संघाने विजेतेपद पटकाविले. त्यांनी अंतिम सामन्यात जय मल्हार इलेव्हन संघाला मात दिली.

पोयनाड येथील सुसज्ज मैदानावर स्पर्धा रंगली. स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष जयंत नाईक, मंडळाचे अध्यक्ष अन्वर बुराण, सचिव किशोर तावडे, दीपक साळवी, अजय टेमकर, माजी सरपंच भूषण चवरकर, सदस्य अजित चवरकर, किशोर जैन, क्रीडा प्रमुख नंदकिशोर चवरकर, शैलेंद्र गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

स्पर्धेत एकूण सहा संघ सहभागी झाले होते. स्पर्धा झुंझार युवक मंडळाच्या सर्व आजी माजी खेळाडू, व्यापारी असोसिएशनचे सदस्य व पोयनाडच्या सर्व युवा खेळाडूंसाठी आयोजित करण्यात आली होती. प्रत्येक संघाला संघमालक व आयकॉन खेळाडू दिला गेला होता व नंतर लिलाव प्रक्रिया करून सर्व सहभागी खेळाडूंना विविध संघात विभागून देण्यात आले. परिधान केलेल्या विविध रंगांच्या गणवेशात खेळाडू झळकून दिसत होते. दोन दिवस उत्स्फूर्तपणे खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेऊन खेळाचा त्यांनी आनंद घेतला.

संपूर्ण स्पर्धेत अष्टपैलू खेळ करणाऱ्या चैतन्य राऊत याला मालिकावीर व अंतिम लढतीसाठी सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. उत्कृष्ट फलंदाज मृण्मय पालव, उत्कृष्ट गोलंदाज राहुल जैन, तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून प्रणय साळवी यांची निवड करण्यात आली.

बक्षीस वितरण समारंभास मंडळाचे अध्यक्ष अन्वर बुराण, ग्रामपंचायत सदस्य सुनील पाटील, माजी सरपंच अनिता गंभीर, भूषण चवरकर, संध्या पाटील, किशोर तावडे, दीपक साळवी, नंदकिशोर चवरकर, सुजित साळवी, व्यापारी असोसिएशनचे सदस्य किशोर जैन, भरत जैन, जितेंद्र जैन, महेश अग्रवाल, प्रदीप जैन, अक्षय अग्रवाल, आरोग्य कर्मचारी संघटना रायगडचे अध्यक्ष अमोल खैरनार, शैलेश पाटील, ॲड. पंकज पंडित, देवेंद्र गंभीर, पंच संदीप जोशी, संकेश ढोले, आदेश नाईक यांच्यासह पोयनाड व्यापारी असोसिएशनचे प्रमुख सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आला उन्हाळा, तब्येत सांभाळा!



उन्हाळ्यात आरोग्य सांभाळण्यासाठी प्रतिबंधक उपायांबरोबरच काही दक्षता आणि खाण्यापिण्यावर बंधने ठेवणेही तितकेच महत्वाचे आहे. उन्हाळ्यामध्ये उष्माघाताचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर दिसतात. यात शरीराचे तापमान उच्च पातळीवर जाते. योग्य ते उपचार वेळेवर न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता असते.

जागतिक तापमानवाढीमुळे वातावरणात सतत बदल होत आहेत. पूर्वी उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या ऋतूंचा वेळ–काळ, ठरलेला असायचा, परंतु आता मात्र तसे नाही. जागतिक तापमानवाढीमुळे उन्हाळ्यात पाऊस, हिवाळ्यात वादळीवारे आणि पाऊस, पावसाळयात कडाक्याचे ऊन अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जागतिक तापमनावाढीमुळे नियमित व वेळेवर पाऊस न पडल्याने पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे उन्हाळ्याची दहाकता जास्त जाणवत आहे. सध्या विविध ठिकाणी उन्हाचे तापमान ४३ ते ४४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले आहे. यामुळे त्वचाविकार, काविळ, टायफाईड, घशाचे आजार, गोवर तसेच उष्माघात असे आजार उद्‌भवू लागले आहेत. वर्तमानपत्र व तसेच वृत्तवाहिन्यांवर उष्माघातच्या बातम्या मोठया प्रमाणात पहावयास मिळत आहेत.

शरीराने मर्यादेपेक्षा जास्त उष्णता निर्माण केली किंवा उष्णता शोषून घेतली तर हायपरथर्मिया म्हणजेच अतिउच्च तापमानाचा आजार होतो. उष्माघात हा त्याचाच एक प्रकार आहे. बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. उष्माघात झाल्यावर चक्कर येणे, मळमळ, उलट्या होणे, डोकेदुखी, दरदरून घाम फुटणे, थकवा येणे, स्नायूंना आकडी येणे अशी लक्षणे दिसू लागतात. म्हणजे प्रमाणाबाहेर वाढलेले शारीरिक तापमान (१०४ डिग्रीपेक्षा जास्त). घाम बाहेर पडत नाही. त्यामुळे त्वचा गरम आणि कोरडी होते. घाम येण्याचे थांबते, नाडीची आणि श्वासाची गती वाढलेली असते, रक्तदाब सुरुवातीला वाढतो आणि नंतर कमी होतो, शरीरात ताठरता येते, हात आणि पायात आकडी (क्रॅम्प्स) येतात, मानसिक बदल होतो, चिडचिड होते, भ्रम होतो आणि कोमा म्हणजेच बेशुद्धवस्था येते आणि मृत्यूसुद्धा ओढवू शकतो. हे असे क्रमाक्रमाने होते. बेशुद्धवस्था हा वयस्कांमध्ये उष्माघातचा पहिला संकेत असू शकतो.

नागरिकांनी उन्हाळ्यात स्वत:ची व कुटुंबाची काळजी कशी घ्यावी यासाठी शासकीय यंत्रणांमार्फत मार्गदर्शक सुचना प्रसिध्द केल्या जात आहेत. शासकीय रुग्णालयांमध्ये उष्माघाताच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी स्वातंत्र कक्ष निर्माण करण्यात आले आहेत. उन्हाळ्यातील उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी पुढील गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे.

### काय करावे

तहान लागलेली नसली तरीसुध्दा जास्तीत जास्त पाणी पिण्यात प्यावे. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. बाहेर जातांना गॉगल्स, छत्री/टोपी, बूट व चपलाचा वापर करण्यात यावा. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी. उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनविण्यात आलेली लस्सी, तोरणी, लिंबू–पाणी, ताक इत्यादींचा नियमित वापर करण्यात यावा. अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उष्माघात होण्याची चिन्हे ओळखावित व चक्कर येत असल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा.

नागरिकांनी स्वत: बरोबर पशू–प्राण्यांची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी गुरांना छावणीत ठेवण्यात यावे तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे. घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. सूर्यप्रकाशाच्या थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सुचित करण्यात यावे. पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. बाहेर कामकाज करीत असताना अधूनमधून विश्रांती घेऊन नियमित आराम करावा. गरोदर, कामगार व आजारी कामगारांची अधिकची काळजी घेण्यात यावी. रस्त्याच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरिता शेड उभारावेत. जागोजागी पाणपोईची सुविधा करण्यात यावी.

### काय करू नये

लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. दुपारी १२.०० ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत. दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत बाहेर काम करणे टाळावे. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी.

उन्हाळ्यात त्रास होऊ लागल्यास जवळच्या शासकीय जिल्हा रुग्णालय अथवा तालुका किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क करावा. अनेक आरोग्य केंद्रात उष्णतेचा त्रास होणाऱ्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षाची सोय करण्यात आली आहे.

**–प्रवीण डोंगरदिवे, उपसंपादक**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

# चेन्नईचा हैदराबादवर दणदणीत विजय

## गायकवाड, देशपांडेची चमक





**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये रविवारी झालेल्या दिवसभरातील दुसऱ्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने सनरायझर्स हैदराबादवर ७८ धावांनी मात केली. चेन्नईच्या या विजयात कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि वेगवान गोलंदाज तुषार देशपांडेने महत्त्वाची भूमिका बजावली. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना चेन्नई संघाने हैदराबाद संघाला २१३ धावांचे लक्ष्य दिले होते, मात्र प्रत्युत्तरात हा १३४ धावांवरच गारद झाला. या विजयाच्या जोरावर चेन्नईने प्ले ऑफच्या शर्यतीत पुन्हा मुसंडी मारली आहे.

नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना सीएसकेची सुरुवात खराब झाली होती. वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारने सलामीवीर अजिंक्य रहाणेला बाद करीत चेन्नईला पहिला धक्का दिला. यानंतर मात्र ऋतुराज आणि डॅरिल मिशेल यांनी शानदार फलंदाजी करीत दुसऱ्या विकेटसाठी १०७ धावांची शतकी भागीदारी करत डाव सावरला. या दरम्याने गायकवाडने या हंगामातील तिसरे अर्धशतक झळकावले, तर डॅरिलही आपले अर्धशतक पूर्ण करण्यात यशस्वी ठरला. मिचेल ३२ चेंडूंत सात चौकार आणि एक षटकारासह ५२ धावा करून परतला.

यानंतर शिवम दुबेने गायकवाडला चांगली साथ दिली. गायकवाडने दुसऱ्या टोकाकडून आक्रमक खेळी सुरू ठेवली आणि सलग दुसरे शतक झळकावण्याच्या जवळ पोहचला, मात्र टी. नटराजनने त्याला बाद करून शतक करण्यापासून रोखले. गायकवाडने ५४ चेंडूंत १० चौकार आणि तीन षटकार मारले. यानंतर धोनी मैदानात आला आणि चेन्नईच्या प्रेक्षकांनी त्याचे जोरदार स्वागत केले.

शिवम दुबेनेही आक्रमक फलंदाजी करीत २० चेंडूंत एक चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ३९ धावा केल्यानंतर नाबाद माघारी परतला. दोन चेंडूंवर एका चौकाराच्या मदतीने पाच धावा केल्यानंतर धोनीही नाबाद राहिला. गायकवाड आणि मिशेलच्या जोरावर सीएसकेला मजबूत धावसंख्या उभारण्यात यश आले. यासह सीएसके संघ टी-२०मध्ये सर्वाधिक वेळा २००पेक्षा जास्त धावा करणारा संघ बनला आहे. सीएसकेने ३५व्यांदा टी-२० क्रिकेटमध्ये द्विशतकाहून जास्त धावा केल्या आणि इंग्लिश काउंटी क्लब सॉमरसेटला मागे टाकले, ज्यांनी ३४ वेळा अशी कामगिरी केली होती.

प्रत्युत्तरात हैदराबादची फलंदाजी अत्यंत खराब झाली आणि संपूर्ण संघ १८.५ षटकांत १३४ धावांत गारद झाला. चेन्नईने हैदराबादविरुद्धच्या विजयासह गुणतालिकेत तीन स्थानांची मोठी झेप घेतली आणि पाच विजयांसह १० गुणांसह गुणतालिकेत तिसरे स्थान गाठले आहे, तर हैदराबाद संघ सलग दोन पराभवांसह चौथ्या स्थानावर घसरला आहे.

# रायगड जिल्हा सॉफ्ट टेनिस संघ जाहीर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सॉफ्ट टेनिस असोसिएशन ऑफ महाराष्ट्र अंतर्गत सांगली जिल्हा सॉफ्ट टेनिस असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने नववी सिनिअर राज्यस्तरीय पुरुष व महिला अजिंक्यपद स्पर्धा ९ ते १२ मेदरम्यान सांगली येथे आयोजित करण्यात आली आहे. यासाठी रायगड जिल्ह्याचा सिनिअर पुरुष व महिला संघ निवडण्यात आला आहे.

रायगड जिल्हास्तरीय सिनिअर सॉफ्ट टेनिस निवड चाचणी नुकतीच पनवेल येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत जिल्हातील सॉफ्ट टेनिस खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला. या निवड चाचणीमधून निवड झालेले प्राविण्यप्राप्त खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेत रायगड जिल्हा संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

**पुरुष संघ** : अश्विन नारायण, राज भिश्वास, जलज पांडे, नारायण सुब्रमण्यम, राज शिंदे, निशांत गायकवाड, श्रेयश गमरे, आदित्य मुंडे.

**महिला संघ** : प्रतीक्षा शेरकर, श्रुती बोणे, समीक्षा शेरकर, दीक्षा वलवे, काजल मंडल.

# पनवेलमध्ये विनामूल्य खो-खो प्रशिक्षण शिबिर



**पनवेल : वार्ताहर**

उन्हाळी सुट्ट्यांचा सदुपयोग व्हावा या भावनेतून तालुका क्रीडा अधिकारी मनीषा मानकर यांनी खो-खो प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे हे उन्हाळी प्रशिक्षण शिबिर पूर्णपणे विनामूल्य असून ५ मेपर्यंत चालणार आहे.

यासाठी तालुका क्रीडा केंद्राच्या क्रीडांगणावर खो-खोची दोन कोर्ट उभारण्यात आली असून तेथे अत्यंत तंत्रशुद्ध पद्धतीने मुलांना प्रशिक्षण दिले जाते. सीनियर केजीपासून ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी या प्रशिक्षणात सहभागी झाल्याचे समजते. सध्या या ठिकाणी ५० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. यातील पाच खेळाडू जरी जिल्हा पातळीपर्यंत पोहचले तरी आमच्या प्रयत्नांना यश आल्याचे आम्ही समजू, अशी प्रतिक्रिया मनीषा मानकर यांनी दिली.

मानकर पुढे म्हणाल्या सुट्ट्यांचा सदुपयोग, खेळाशी ओळख आणि फिटनेस अशी तिहेरी उद्दिष्टे या शिबिराच्या माध्यमातून साध्य करण्याचा आमचा मानस आहे.

# आराध्या पुरो बुद्धीबळ स्पर्धेत प्रथम



**उरण : वार्ताहर**

अलिबाग येथे नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत उरण तालुक्यातील बोरी गावात राहणारी आराध्या विनोद पुरो या सातवी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने अकरावीच्या वयोगटातील स्पर्धकांबरोबर सहभाग घेत प्रथम क्रमांक पटकावला.

बुद्धीबळ खेळात आराध्या हिने या दोन वर्षांमध्ये ५२ बक्षिसे मुंबई, ठाणे, कल्याण, पनवेल, नवी मुंबई, अलिबाग या ठिकाणी मिळविली आहेत. आराध्याला तिच्या आई, वडिलांचे भक्कम पाठबळ लाभते. या यशाबद्दल तिचे महाराष्ट्र बुद्धीबळ फाऊंडेशनचे राज्याध्यक्ष विलास पाटील यांनी अभिनंदन व कौतुक केले. परिसरातून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.













**पनवेल** : मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ कामोठे येथे रविवारी जाहीर सभा झाली. या सभेस खासदार बारणे, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, क्लस्टर प्रमुख बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.














**पनवेल** : महायुतीचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ रविवारी नवीन पनवेल परिसरात भव्य बाईक रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत शेकडो तरुण महायुतीतील आपापल्या पक्षाचे झेंडे घेऊन सहभागी झाले होते, तर विजयारथामध्ये खासदार बारणे, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, क्लस्टर प्रमुख बाळासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्यासह महायुतीच्या घटक पक्षांतील पदाधिकारी होते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com